// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : ११


# साद
## दे, साथ घे

जानेवारी २०२०

# निर्भयाला न्याय दृष्टिपथात


**महिला आणि बालकल्याणमंत्रीपदी यशोमती ठाकूर**

**राज्यातील 'वन स्टॉप सेंटर्स'चा महिला आयोगाकडून अभ्यास**



महाराष्ट्र राज्य महिला आयोग

# अंतरंग...


## राज्यातील ‘वन स्टॉप सेंटर्स’चा महिला आयोगाकडून अभ्यास

मुंबई : अत्याचार पीडित महिलेला एकाच छताखाली समुपदेशन, कायदेविषयक मदत, निवारा, वैद्यकीय मदत मिळावी यासाठी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे “वन स्टॉप सेंटर्स” ही योजना सुरु आहे.


६



## भारताची ग्रेटा थनबर्ग : लिसीप्रिया कंगुजम

हवामानातल्या बदलांच्या विरोधात लढा देण्यासाठी स्वीडनची सोळा वर्षीय कार्यकर्ती ग्रेटा थनबर्गप्रमाणेच भारतातही एका आठ वर्षांच्या मुलीने पुढाकार घेतला आहे. तिचे नाव आहे लिसिप्रिया कंगुजम.

२१



## लोकप्रतिनिधींच्या शिक्षणाचे धोरण

ग्रामपंचायत स्तरावर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना कारभाराची माहिती मिळावी, यासाठी धोरण आखण्यात आले आहे. त्यांची कर्तव्ये, अधिकार, त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा यांची माहिती करून दिली जाते.

३१



## महाराष्ट्राच्या मुलींची झेप

खो, मैदानी, जिम्नॅस्टिक्स, कबड्डी, बास्केटबॉल, हातोडाफेक, गोळाफेक या क्रीडा प्रकारात संपूर्ण देशात महाराष्ट्राने आपला झेंडा रोवला. स्पर्धेत सर्वाधिक पदके मिळवत खेळाडूंनी राज्याचा दबदबा देशाच्या क्रीडा क्षेत्रात निर्माण केला.

३३

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
साद
दे, साथ घे
RNI No. MAHMAR49593

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## न्यायाला विलंब दुःखद

सात्या देशाला हादरवून टाकणाऱ्या निर्भया बलात्कार प्रकरणतील अत्याचाऱ्यांना १ फेब्रुवारी रोजी फाशी देण्यात येणार आहे. या दोषींना २२ जानेवारीला फाशी देण्याच्या दिल्लीतील न्यायालयाच्या सात जानेवारीच्या निकालावर देशभर समाधानाची प्रतिक्रिया उमटली. अत्यंत क्रूर, रानटी पद्धतीने निर्भयाशी जो व्यवहार झाला, तो करणाऱ्यांच्या मृत्युदंडाच्या शिक्षेची अखेर अंमलबजावणी दृष्टिपथात आली होती. सात वर्षांनंतर हे घडत असल्यामुळे एका बाजूला आनंद आणि दुसऱ्या बाजूला कालापव्ययाबद्दल खेद अशा दुहेरी भावना व्यक्त केल्या जात होत्या.

सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निर्भयाच्या आरोपींना फासावर लटकवण्याचा निर्णय झाला आहे. तरीही, कायद्यातील पळवाटा शोधत आणखी वेळ दवडण्याचा प्रयत्न हे आरोपी करीत आहेत. २२ जानेवारीची मुदत उलटून आता १ फेब्रुवारीला या आरोपींना फाशी दिली जाईल. तरीही पवन गुप्ता याने उच्च न्यायालयात केलेली आव्हान याचीका अद्याप प्रलंबित आहे. फेरविचार याचिका, दयेचा अर्ज, शिक्षेला आव्हान अशा अनेक किचकट कायदेशीर प्रक्रिया रोज पार पाडल्या जात आहेत. यातून फक्त न्यायदानाला विलंब होत आहे. गुन्हेगारांना हेच हवे असल्यामुळे शब्दशः आजचे मरण उद्यावर ढकलण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात आहे. भारत हा लोकशाही आणि घटनात्मक चौकटीत चालणारा देश असल्यामुळे गुन्हेगारांना त्यांच्या बचावाच्या सर्व संधी उपलब्ध करून देणे हे अनिवार्यच आहे. त्यामुळे न्याय यंत्रणेसह सर्वांना या कालापव्ययातील व्यर्थता समजत असूनही साऱ्यांचेच हात बांधलेले आहेत. ही बाब कोणालाच आवडणारी नाही. न्यायाला विलंब म्हणजे न्यायाला नकार असे म्हटले जाते. निर्भया प्रकरणाला सात वर्षे उलटूनही तिच्या मारेकऱ्यांना आणि बलात्काऱ्यांना शिक्षा होत नाही, हे गंभीर आणि वेदनादायक आहे. हा विलंब टाळण्यासाठी काय करता येईल, यावर सर्वांनी साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. कोणाचाही कायदेशीर अधिकार डावलला जाऊ नये, हे तत्त्व मान्य केले तरीही सध्या निर्भया प्रकरणात जे काही सुरू आहे, ते न्यायव्यवस्थेचा गैरफायदा म्हणता येईल. गुन्हेगार सर्व न्यायालयांमध्ये दोषी ठरले आहेत. त्यांचा गुन्हा अतिगंभीर वर्गवारीत मोडत असल्यामुळे त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. असे असतानाही आरोपींकडून फेरविचार याचिका, दयेचा अर्ज, पुन्हा याचिका असे कायदेशीर खेळ खेळले जात आहेत. हे कधीतरी थांबवालयाच हवे. निर्भया प्रकरण ही देशाला सुन्न करणारी घटना होती. सारा देश त्या वेळी पेटून उठला. त्यानंतर कायद्यांतही बदल केले गेले. देशाला हादरवणाऱ्या या घटनेबाबत समाजमन अत्यंत संवेदनशील आहे. या संवेदनांचा विचार व्हायला हवा. न्यायदानातील आणि निकालाच्या अंमलबजावणीतील विलंब थांबायलाच हवा.

**विजया रहाटकर,** मुख्य संपादक आणि
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

## कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याबाबत (पॉश) देशातील पहिला ऑनलाइन अभ्यासक्रम

**अभ्यासक्रमातील ठळक घटक**

- लैंगिक छळ म्हणजे नेमके काय?
- कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची व्याख्या
- 'पॉश' कायदा
- 'पॉश' कायद्याचा परिणाम आणि प्रतिसाद
- आपण बदल कसा घडवू शकतो?




**ऑनलाइन नोंदणी येथे करा : www.safindia.academy**

SAF INDIA ACADEMY

PUSH
people United against Sexual Harassment

# निर्भयाच्या मारेकऱ्यांना एक फेब्रुवारीला फाशी

**नवी दिल्ली :** दिल्लीतील निर्भया सामूहिक बलात्कार आणि खून प्रकरणातील नराधमांच्या बचावाचे सर्व मार्ग संपुष्टात आले असून, राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी दोषी मुकेश सिंह याची दया याचिका आज फेटाळून लावली. राष्ट्रपतींनी हा अर्ज फेटाळताच न्यायालयाने पुन्हा नव्याने या चारही नराधमांविरोधात डेथ वॉरंट जारी केले असून, आता १ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता या चौघांनाही फाशी देण्यात येईल.

अतिरिक्त सत्र न्या. सतीशकुमार अरोरा यांच्यासमोर आज दोषी मुकेशच्या याचिकेवर सुनावणी झाली. मुकेशने त्याच्या याचिकेमध्ये २२ जानेवारी रोजी फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी केली जाऊ नये असे म्हटले होते. दरम्यान, आजच्या सुनावणीदरम्यान सकाळीच तिहार तुरुंग प्रशासनाने या चारही नराधमांविरोधात नव्याने डेथ वॉरंट जारी केले जावे, अशी मागणी केली होती. या वेळी सरकारी वकील इरफान अहमद यांनी दोषी मुकेशची दया याचिका राष्ट्रपतींनी फेटाळली असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले, त्यानंतर नव्याने डेथ वॉरंट जारी करण्यात आले.

केंद्रीय गृहमंत्रालयाने दोषी मुकेश याची याचिका गुरुवारी रात्री उशिरा राष्ट्रपतींकडे पाठविली होती; पण राष्ट्रपतींनी ती फेटाळून लावल्याचे मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले. राष्ट्रपतींच्या या निर्णयाचे निर्भयाच्या वडिलांनी स्वागत केले आहे. ही खरोखरच चांगली बाब आहे, त्या नराधमांच्या शिक्षेला विलंब होऊ शकतो, अशा बातम्या प्रसृत झाल्याने आमच्या चिंता वाढल्या होत्या, असे त्यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. या प्रकरणातील दोषी मुकेशने दोन दिवसांपूर्वी राष्ट्रपतींकडे दया अर्ज सादर केला होता.




## ती काळरात्र

२०१२ मधील या सामूहिक बलात्कार प्रकरणात सुरवातीस सहा आरोपींचा समावेश होता. यामध्ये मुकेश सिंह, विनय शर्मा, अक्षयकुमार सिंह, पवन गुप्ता, रामसिंह आणि अन्य एका अल्पवयीन आरोपीचा समावेश होता. या सर्वांनी सोळा डिसेंबरच्या रात्री दक्षिण दिल्लीमध्ये धावत्या बसमध्येच निर्भयावर हल्ला करत तिच्यावर सामूहिक बलात्कार करून तिचा खून केला होता. या घटनेचे देशभर तीव्र पडसाद उमटले होते. जखमी अवस्थेतील निर्भयाला वाचविण्याचा डॉक्टरांनी पुरेपूर प्रयत्न केला; पण २९ डिसेंबर रोजी सिंगापूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान ती मरण पावली. या प्रकरणात पाचही नराधमांविरोधात २०१३ मध्ये जलदगती न्यायालयामध्ये खटला चालविण्यात आला होता. यातील प्रमुख आरोपी राम सिंह याने मात्र खटला सुरू होण्यापूर्वीच तिहार तुरुंगामध्ये आत्महत्या केली.

**(सौजन्य : सकाळ)**

### याचिकांचे सत्र संपेना

सर्वोच्च न्यायालयाने फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिल्यानंतरही निर्भया प्रकरणातील दोषी एकानंतर एक याचिका करत आहेत. गुन्हा घडला त्या वेळी आपण अल्पवयीन होतो, हा आपला दावा फेटाळणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला पवनकुमार गुप्ता या दोषीने आव्हान दिले आहे. गेल्या वर्षी २१ डिसेंबरला न्यायालयाने पवनकुमारचा दावा फेटाळला होता. पवनकुमारने एक फेब्रुवारीला जाहीर झालेल्या फाशीच्या अंमलबजावणीलाही स्थगिती देण्याची मागणी या याचिकेत केली आहे. याप्रकरणी मुकेशकुमारची दया याचिका राष्ट्रपतींनी फेटाळली असली तरी विनय शर्मा, अक्षयकुमार सिंह आणि पवनकुमार यांनी दया याचिका केलेली नाही. तसेच, अक्षयकुमार अणि पवनकुमार यांनी अद्याप दुरुस्ती याचिकाही केलेली नाही.

# राज्यातील ‘वन स्टॉप सेंटर्स’चा महिला आयोगाकडून अभ्यास

## केंद्र व राज्य सरकारला शिफारशी सादर

**मुंबई :** अत्याचार पीडित महिलेला एकाच छताखाली समुपदेशन, कायदेविषयक मदत, निवारा, वैद्यकीय मदत मिळावी यासाठी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाद्वारे “वन स्टॉप सेंटर्स” ही योजना सुरु आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी ही योजना महत्वपूर्ण असल्याने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने राज्यातील अकरा वन स्टॉप सेंटर्सचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाचा अहवाल शिफारसींसह मा. केंद्रीय महिला व बालविकास मंत्री स्मृती इराणी, मा.राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, महिला व बालविकास मंत्री मा. यशोमती ठाकूर यांना सादर केला आहे.

वन स्टॉप केंद्राच्या कामकाजाबद्दलची निरीक्षणे आणि निष्कर्ष तसेच कामगिरी सुधारण्याबाबतच्या शिफारसी या अहवालात नमूद केल्या आहेत. अहमदनगर, अकोला, अलिबाग, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नांदेड, नाशिक, सातारा जिल्ह्यातील प्रत्येकी एक आणि पुणे येथील दोन अशा ११ केंद्रांचा अभ्यास केला आहे. पुण्यातील आयएलएस लॉ कॉलेजच्या स्त्री अध्ययन केंद्राच्या मदतीने हा अभ्यास केला आहे, ही माहिती आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी दिली. महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम १९९३, अंतर्गत कलम १०(१), (क), (ड) नुसार स्त्रियांच्या प्रश्नांबाबत सरकारला शिफारसी करण्याचा अधिकार महिला आयोगाला आहे.




### मुख्य शिफारशी

- वन स्टॉप सेटर इमारतीसाठी मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य जागा नसल्याने कोणतेही सेंटर २४ तास कार्यरत नाही.
- सेंटर चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची नेमणूक केल्यास अधिक सक्षमपणे सेंटर कार्यरत असल्याचे दिसून आले. ११ पैकी २ सेंटर्स ‘'एनजीओं”च्या माध्यमातून सध्या सुरु आहेत.
- अतिरिक्त कामकाज करणारे कर्मचारी पूर्णपणे बांधील राहू शकत नसल्याने २४ तास सेंटर चालत नाही. त्यामुळे सक्षम संस्था नियुक्त करणे गरजेचे आहे.
- वन स्टॉप सेंटर चालविण्यासाठी केंद्रीय महिला बालविकास मंत्रालय १०० टक्के आर्थिक सहाय्य देते. तथापि निधीचे वेळेवर वितरण आणि संबंधित विभागांसोबत समन्वय गरजेचा आहे. अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. कामकाज सुरळीत चालण्यासाठी निधी वेळेवर मिळणे आवश्यक आहे.
- वन स्टॉप सेंटरमधील कर्मचार्यांना विशेष प्रशिक्षणाची गरज असून त्यामध्ये लिंगभाव संवेदनशीलतेचा मुद्दा प्रामुख्याने असावा.
- देखरेख यंत्रणेने अचानक भेट देणे, ठराविक महिन्यांनी आढावा बैठक घेणे गरजेचे आहे.
- जाणीव जागृती कार्यक्रम, माध्यमांचा वापर यातून सेंटरकडून महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न व्हावा.
- ‘हेल्पलाइन’ बळकट करणे आवश्यक आहे.

# राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

**मुंबई : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिफारस केलेल्या मंत्रिमंडळाच्या खातेवाटपास राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी मान्यता दिली असून मंत्री व राज्यमंत्री यांच्यातील खातेवाटप पुढीलप्रमाणे आहे.**

## मंत्री

| मंत्री | खाते |
|---|---|
| उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री | सामान्य प्रशासन, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय, व इतर कोणत्याही मंत्र्यांना नेमुन न दिलेले विषय/खाती |
| अजित अनंतराव पवार | उपमुख्यमंत्री, वित्त, नियोजन |
| सुभाष राजाराम देसाई | उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा |
| अशोक शंकरराव चव्हाण | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) |
| छगन चंद्रकांत भुजबळ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण |
| दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | कामगार, राज्य उत्पादन शुल्क |
| जयंत राजाराम पाटील | जलसंपदा व लाभक्षेत्र विकास |
| नवाब मोहम्मद इस्लाम मलिक | अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता |
| अनिल वसंतराव देशमुख | गृह |
| बाळासाहेब भाऊसाहेब थोरात | महसूल |
| राजेंद्र भास्करराव शिंगणे | अन्न व औषध प्रशासन |
| राजेश अंकुशराव टोपे | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण |
| हसन मियालाल मुश्रीफ | ग्राम विकास |
| डॉ.नितीन काशिनाथ राऊत | उर्जा |
| वर्षा एकनाथ गायकवाड | शालेय शिक्षण |
| डॉ. जितेंद्र सतीश आव्हाड | गृहनिर्माण |
| एकनाथ संभाजी शिंदे | नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) |
| सुनिल छत्रपाल केदार | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण |
| विजय वडेट्टीवार | इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, खार जमिनी विकास, भूकंप पुनर्वसन |
| अमित विलासराव देशमुख | वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य |
| उदय रविंद्र सामंत | उच्च व तंत्र शिक्षण |
| दादाजी दगडू भुसे | कृषि, माजी सैनिक कल्याण |
| संजय दुलिचंद राठोड | वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन |
| गुलाबराव रघुनाथ पाटील | पाणी पुरवठा व स्वच्छता |
| ॲड. के.सी. पाडवी | आदिवासी विकास |
| संदीपानराव आसाराम भुमरे | रोजगार हमी, फलोत्पादन |
| बाळासाहेब पांडुरंग पाटील | सहकार, पणन |
| ॲड. अनिल दत्तात्रय परब | परिवहन, संसदीय कार्य |
| अस्लम रमजान अली शेख | वस्त्रोद्योग, मत्स्य व्यवसाय, बंदरे विकास |
| ॲड. यशोमती ठाकूर (सोनवने) | महिला व बालविकास |
| शंकरराव यशवंतराव गडाख | मृद व जलसंधारण |
| धनंजय पंडितराव मुंडे | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य |
| आदित्य उद्धव ठाकरे | पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार |

राज्यमंत्री

| अब्दुल नबी सत्तार | डॉ. विश्वजित पतंगराव कदम |
|---|---|
| महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य | सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, मराठी भाषा |
| **सतेज उर्फ बंटी डी. पाटील** | **राजेंद्र श्यामगोंडा पाटील यड्रावकर** |
| गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य |
| **शंभुराज शिवाजीराव देसाई** | **संजय बाबुराव बनसोडे** |
| गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन | पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्य |
| **ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू** | **प्राजक्त प्रसादराव तनपुरे** |
| जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, कामगार | नगर विकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन |
| **दत्तात्रय विठोबा भरणे** | **आदिती सुनिल तटकरे** |
| सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुधव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन | उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रिडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क |

# महिला आणि बालकल्याणमंत्रीपदी यशोमती ठाकूर



**मुंबई :** महिला व बालविकास मंत्री अड. यशोमती ठाकूर (सोनवणे) यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. मंत्रालय विस्तार इमारतीत पाचव्या मजल्यावरील त्यांचे दालन क्रमांक ५४० हे आहे.

यावेळी माजी मंत्री अनीस अहमद, महिला व बालविकास सचिव आय. ए. कुंदन, आयसीडीएस आयुक्त इंद्रा मालो, सहसचिव लालसिंग गुजर, उपायुक्त गोकुळ देवरे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी मंत्री श्रीमती ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. ठाकूर अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदारसंघातून विधानसभेच्या सदस्य आहेत. काँग्रेसच्या उमेदवारीवर त्या सलग तिसऱ्यांदा विधानसभेवर निवडून आले आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर ठाकूर म्हणाल्या, ''बचतगट चळवळीद्वारे महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने काम करणार आहे. महिला आयोगाचे सेंटर प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्याचा मानस आहे. महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याच्या दृष्टीने काम करणार आहोत. तसेच बालगृह, अनाथ मुले, बालकल्याणसाठी नवीन योजना आणण्यात येईल.''

राज्य महिला आयोग महिला आणि बालकल्याण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली काम करतो. नवनियुक्त मंत्री यशोमती ठाकूर यांचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी अभिनंदन केले आहे.

# ‘पोक्सो’ खटल्यांसाठी विशेष वकील

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश; प्रशिक्षण कार्यक्रम आखण्याच्याही सूचना

**नवी दिल्ली : लैंगिक शोषणाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयामध्ये पीडित अल्पवयीन आणि साक्षीदारांसोबत कशा पद्धतीने वागायचे याचे प्रशिक्षण सरकारी वकिलांना देणे गरजेचे आहे, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने आज यासाठी वेगळा प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करण्याचा आग्रह धरला. लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण कायदा (पोक्सो) अंतर्गत दाखल झालेल्या खटल्यांसाठी विशेष प्रशिक्षण असणाऱ्या सरकारी वकिलांची गरज असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे.**



‘‘लैंगिक हिंसाचाराला बळी पडलेल्या अल्पवयीन मुलांकडून सत्य कसे वदवून घ्यायचे, याची माहिती संबंधित वकिलास असायला हवी. कारण अशा घटनांची उजळणी त्यांच्याकडून करवून घेताना त्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागतो. ‘पोक्सो’ कायद्याअंतर्गत दाखल खटल्याच्या सुनावणीसाठी नेमण्यात आलेल्या वकिलांचे काम हे कष्टदायक असते. असा खटला हाताळताना संबंधित वकिलाने अधिक काळजीपूर्वक हाताळणी करणे गरजेचे असून, संबंधित व्यक्तीकडे तशी संवेदनशीलता देखील हवी,’’ असे न्यायालयाने नमूद केले.

अशा खटल्यांमध्ये वकील केवळ परिपूर्ण असून चालत नाही, तर या कायद्यासंदर्भातील खटल्यांना हाताळण्यासाठी सरकारी वकिलांना विशेष प्रशिक्षण दिले जावे, तसा प्रशिक्षण कार्यक्रमदेखील तयार केला जाणे गरजेचे आहे. हे खटले केवळ कायदेशीर बाबींपुरते मर्यादित नसतात. मानसशास्त्रीय, आरोग्यविषयक आणि अन्य अनेक बाबी त्याच्याशी संबंधित आहेत, असे निरीक्षण न्या. दीपक गुप्ता आणि न्या. अनिरुद्ध बोस यांनी नोंदविले.

### २८ फेब्रुवारीपर्यंतची मुदत

न्यायालयाने आज या संदर्भातील सुनावणीदरम्यान आसाम आणि जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल यांना तेथील ‘पोक्सो’शी संबंधित न्यायालयांमध्ये केवळ त्याच खटल्यांची सुनावणी होईल, अशी हमी देणारे शपथपत्र सादर करण्यास सांगितले. यासाठी दोन्ही न्यायालयांना २८ फेब्रुवारीपर्यंतची मुदत ठरवून देण्यात आली आहे.

### विविधांगी प्रशिक्षण गरजेचे

केवळ ‘पोक्सो’कायद्याअंतर्गत दाखल झालेल्या खटल्यांच्या सुनावणीसाठी सरकारने सर्व न्यायालयांमध्ये एक विशेष सरकारी वकील नेमावा, असे निर्देशही न्यायालयाने या वेळी दिले. आम्ही सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना विनंती करतो की, कायदेविषयक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये या संदर्भातील एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला जावा, त्यामुळे ‘पोक्सो’ कायद्याशी निगडित असलेल्या वकिलांना केवळ कायद्याचेच नाही, तर बाल मानसशास्त्र, वर्तणूकशास्त्र आणि आरोग्याशी संबंधित बाबींचे प्रशिक्षण घेता येईल. राष्ट्रीय न्यायीक अकादमीच्या संचालकांना आम्ही या संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्याची विनंती करतो. केवळ राष्ट्रीय न्यायीक अकादमीच सर्व सरकारी वकिलांना प्रशिक्षण देऊ शकत नाही याची पूर्ण जाणीव आम्हाला आहे. पण ते या संदर्भात तज्ज्ञांचे एक पथक मात्र नेमू शकतात ते देशभर फिरेल आणि अन्य सरकारी वकिलांना याचे प्रशिक्षणही देईल,’’ असे निरीक्षण खंडपीठाने नोंदविले.

**(वृत्तसौजन्य : सकाळ)**



# नगर जिल्ह्यातील निवृत्त जवानाला पत्नीने दिला मुखाग्नी

## पाथर्डी येथे जैन धर्माच्या परंपरेला छेद देत ज्येष्ठ महिलेचा निर्णय

**अहमदनगर :** जैन धर्माच्या परंपरेला छेद देत पाथर्डीत पत्नीने पतीचे अंत्यसंस्कार केले. जैन धर्मात महिला घरातील व्यक्तीचा मृत्यू झाला तरीही अंत्यसंस्काराला उपस्थित राहात नाहीत, अशी परंपरा आहे. मात्र, तिला छेद देत देशासाठी तीन युद्धांत सहभाग घेतलेल्या पतीचे अंत्यसंस्कार जैन समाजातील ७२ वर्षीय छायाबाई गांधी यांनी करीत वेगळे धाडस दाखवले.

शहराच्या मोहनवाडी परिसरात राहणारे निवृत्त सैनिक मनसुखजी दानमल गांधी यांचे १५ जानेवारीला हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मनसुख गांधी यांनी लष्करात असताना १९६२, ६५ आणि ७१ च्या युद्धात भाग घेतला होता. लष्करातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी पाथर्डी येथे राहायचे ठरवले. एकमेव अपत्याचाही मृत्यू झाल्याने उपजीविकेचे साधन म्हणून छायाबाईंनी स्वेटर विणून विक्रीचा व्यवसाय सुरू केला. पत्नीला साथ देताना मनसुखलाल गांधी यांनीसुद्धा स्वतःचे छोटे किराणा दुकान सुरू केले.

मनसुखलाल आणि छायाबाई गांधी यांना अपत्य नसल्याने अंत्यसंस्कार कोण करणार, असा प्रश्न मनसुख यांच्या मृत्यूनंतर उपस्थित झाला. त्यावर अंत्यसंस्कार मीच करणार, असे छायाबाईंनी नातेवाइकांना सांगितले. काही नातेवाइकांनी विरोध केला. मात्र, छायाबाई आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. त्यानंतर या निर्णयाला जैन समाजातील पंच कमिटी आणि नातेवाइकांनी मान्यता दिल्यानंतर कोरडगाव रस्त्यावरील अमरधाममध्ये छायाबाईंनी आपल्या हाताने चितेला अग्नी दिला.

**(वृत्तसौजन्य : देशदूत)**




# बीडमध्ये विधवांची मकरसंक्रांत

## पती निधनानंतर शिक्षिकेने उचलले हे पाऊल

**बीड :** मकरसंक्रांत म्हणजे सुवासिनींचा सण. या सणात हळदी-कुंकवाला तेवढेच महत्त्व आहे. सणानिमित्त सुवासिनी एकत्र येऊन हळदी-कुंकवाने सुरवात करूनच वाण लुटतात; परंतु विविध कारणांनी वैधव्य आलेल्या महिलांना संक्रांतीला धुमसत बसण्याशिवाय पर्याय नसतो. मात्र, बीडजवळ विधवांचीही संक्रांत साजरी झाली आहे. विधवा सहशिक्षकेच्या पुढाकाराने हा सण साजरा झाला.

पालवण येथे १०५ विधवांना संक्रांती सणानिमित्त मंगळवारी (ता. १४) साडी-चोळी देण्यात आली. जिल्हा परिषदेच्या शाळेत सहशिक्षिका असलेल्या मनीषा जायभाये यांनाही पतीच्या अपघाती निधनामुळे वैधव्य आले. महिलांच्या सणावारांत इतर महिला उत्साहात असायच्या आणि मनीषा जायभाये मात्र अधिकच दुःखी असायच्या. पण, सुवासिनींची सण साजरे करावेत आणि विधवांनी फक्त दुःखात पाहायचे का, या भावनेतून त्यांनी तीन वर्षांपासून विधवांसाठीही संक्रांत सुरू केली.

पतीने प्रेमाने लावलेले कुंकू, घातलेले मंगळसूत्र, पायातील जोडवे आदी आभूषणे उतरवली जातात. ही प्रथा त्या महिलेला सतत अग्निडाग देणारी असल्याच्या भावनेतून त्यांनी हा उपक्रम सुरू केला. या बदलासाठी मकर संक्रांतीच्या दिवशी विधवा महिलांना साडीचोळी देऊन तिचा सन्मान करण्याचा प्रयत्न त्या तीन वर्षांपासून करत आहेत. या उपक्रमाला समाज मान्यता मिळावी, अशीही त्यांची अपेक्षा आहे.

दरम्यान, पालवण येथे १०५ विधवा महिलांना मंगळवारी साडी-चोळी भेट देण्यात आली. या वेळी जिल्हा परिषद सदस्या रेखा क्षीरसागर, जयश्री विधाते, सत्यभामा बांगर, मंगेश लोळगे, अंबादास इंगळे, अर्जून सुसे, सपना सुसे, डॉ. नेहरकर, किरण कानडे, दादासाहेब शेळके, दीपक नरवडे, आश्रुबा खेडकर, केंद्रीय मुख्याध्यापिका श्रीमती लाहोर, निर्मळ अंकुश, वैभव स्वामी डॉ. नीलेश डुमणे, श्री. गरकळ, श्री. भुरे, अजिंक्य कदम, डी. एन. सावंत, संतोष ससाने, प्रतीक जायभाये उपस्थित होते. दरम्यान, पाहुण्यांना कुंकवाच्या रंगाचे गुलाब झाड भेट देऊन सत्कार करण्यात आला.

# महिला-बालकांसाठी चार कायदे

## २०१९ ठरले महत्त्वाचे वर्ष

## अनेक वर्षांपासूनचे प्रलंबित कायदे अखेर लागले मार्गी

सरते वर्ष महिला आणि बालकांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सरत्या वर्षात चार महत्त्वाचे कायदे संसदेत मंजूर करण्यात आले आहेत. यातील काही कायदे गेल्या ६७ वर्षांपासून प्रलंबित होते. या कायद्यांची थोडक्यात ओळख अशी :

### सरोगसी नियमन विधेयक

हे विधेयक पाच जुलै २०१९ रोजी केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्ष वर्धन यांनी लोकसभेत मांडले. तेथे ते पाच ऑगस्ट रोजी मंजूर झाले. देशात व्यावसायिक सरोगसीला बंदी घालणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

### विधेयकातील ठळक तरतुदी

अ) व्यावसायिक सरोगसीला पूर्ण बंदी

आ) पर्यायी सरोगसीवरही निर्बंध. ज्या योगे सरोगेट मातेला फक्त वैद्यकीय खर्च आणि विम्याचा खर्च इतकाच मोबदला गर्भावस्थेत मिळेल.

इ) सरोगसीद्वारे जन्माला येणाऱ्या बालकांच्या हक्कांचे रक्षण

ई) ज्या भारतीय जोडप्यांचा विवाह होऊन किमान पाच वर्षे झाली असतील आणि ज्यांना वंध्यत्वाचे निदान झाले असेल, अशांनाच सरोगसीद्वारे मूल प्राप्त करता येईल. त्यासाठी पत्नीचे वय २३ ते ५० वर्षे आणि पतीचे २३ ते ५५ वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. तसेच, सरोगेट माता ही या दाम्पत्याची जवळची नातेवाईक असणे आवश्यक आहे.

उ) एकल पालक, समलैंगिक, लिव्ह इनमध्ये राहणारी जोडपी यांना सरोगसीद्वारे अपत्यप्राप्ती करून घेता येणार नाही.

ऊ) सरोगेट मातेचे वय २५ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक असून, तिला स्वतःचे अपत्य असणे बंधनकारक आहे.

ऋ) एका स्त्रीला आयुष्यात एकदाच सरोगेट माता बनता येईल.

### मुस्लिम महिला (विवाहायोगे प्राप्त अधिकार रक्षण) कायदा

मुस्लिम महिला (विवाहायोगे प्राप्त अधिकार रक्षण) विधेयक २०१९ २१ जू न २०१९ रोजी विधी मंत्री रविशंकर प्रसाद यांनी लोकसभेत



मांडले. ते लोकसभेत २५ जुलै रोजी मंजूर झाले आणि राज्यसभेत ते ३० जुलैला मंजूर झाले. तिहेरी तलाक बेकायदा ठरविणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

### ठळक तरतुदी

अ) या कायद्यानुसार, तोंडी, लेखी, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दिलेला असा कोणत्याही प्रकारचा तडकाफडकी दिलेला तिहेरी तलाक बेकायदा आहे.

आ) मुस्लिम पर्सन कायद्यातील तलाक इ बिद्दत ही प्रथा रद्दबातल ठरविण्यात आली आहे.

इ) तीन वेळा तलाक उच्चारून विवाहविच्छेद केल्यास संबंधित पुरुषाला तुरुंगवासाची शिक्षा

ई) एखाद्या स्त्रीने या कायद्याचा गैरवापर केल्यास त्याविरोधात दाद मागण्याचा मुस्लिम पतीला अधिकार

उ) तिहेरी तलाक हा या कायद्यानुसार दखलपात्र गुन्हा

ऊ) एखाद्या स्त्रीला पतीने तिहेरी तलाक दिल्यास मुलांचा ताबा मिळविण्याचा पत्नीला अधिकार

### बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध (सुधारणा) कायदा

बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध (सुधारणा) कायदा किंवा सामान्यपणे ज्याला पोक्सो म्हटले जाते, या कायद्याचे विधेयक १८ जुलै २०१९ रोजी राज्यसभेत केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री स्मृती इराणी यांनी मांडले. ते २४ जुलैला राज्यसभेत मंजूर झाले. एक ऑगस्टला लोकसभेत हे विधेयक मंजूर झाले. कोणत्याही प्रकारच्या लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण करणे, हा या कायद्यामागील हेतू आहे.

### ठळक तरतुदी

अ) बालकांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना फाशीच्या

शिक्षेची तरतूद

आ) सोळा वर्षांखालील मुलांशी संभोग केल्यास गुन्हेगाराला किमान वीस वर्षे ते आजन्म कारावासाची शिक्षा आणि दंडाची तरतूद

इ) बालकांवरील लैंगिक अत्याचारप्रकरणात एकापेक्षा अधिक वेळा दोषी ठरल्यास किमान वीस वर्षांचा कारावास अथवा गुन्ह्याच्या गांभीर्यानुसार फाशीची शिक्षा

ई) पोर्नोग्राफीसाठी मुलांचा वापर केल्यास अथवा मुलांचा समावेश असलेले पोर्नोग्राफीक डेटा व्यावसायिक कारणांसाठी बाळगल्यास अनुक्रमे किमान पाच वर्षे आणि तीन वर्षांची तुरुंगवास.

## तृतीयपंथी व्यक्ती (अधिकार रक्षण) विधेयक

तृतीयपंथीयांच्या अधिकारांचे रक्षण करणारे हे विधेयक १९ जुलै २०१९ रोजी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री थावरचंद गेहलोत यांनी लोकसभेत मांडले. लोकसभेत हे विधेयक पाच ऑगस्टला मंजूर करण्यात आले. राज्यसभेत ते २६ नोव्हेंबरला मंजूर करण्यात आले. तृतीयपंथीयांच्या हक्कांचे रक्षण करणे हा या कायद्यामागील हेतू आहे.

## ठळक तरतुदी

अ) शिक्षण, नोकरी, आरोग्य, विविध सार्वजनिक सुविधांची उपलब्धता, राहण्याचा आणि फिरण्याचा अधिकार, मालमत्तेचा अधिकार, सार्वजनिक वा खासगी पद उपभोगण्याचा अधिकार आदींबाबत तृतीयपंथीयांबाबत भेदभाव करता येणार नाही.

आ) संबंधित तृतीयपंथी एखाद्या सरकारी वा खासगी संस्थेच्या देखभालीखाली असल्यास तेथे त्यांना प्रवेशापासून रोखता येणार नाही

इ) ऐच्छिक वा वेठबिगारी, सार्वजनिक ठिकाणी वावरापासून रोखणे, घरातून वा गावातून हाकलून देणे, शारीरिक, लैंगिक, शाब्दिक व आर्थिक छळ करता येणार नाही.

ई) या कायद्यान्वये दोषी ठरलेल्या व्यक्तीस किमान सहा महिन्यापासून दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

**(वृत्तसौजन्य : जागरण जोश)**

---

# महिलांसाठीच्या योजनांचा विभागीय पातळीवर आढावा

## महिला आणि बाल कल्याण मंत्री यशोमती ठाकूर यांची माहिती



**मुंबई :** महिला व बालविकास विभागासंदर्भात असणाऱ्या योजनांचा व कामकाजाचा विभागीय पातळीवर आढावा घेणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री यशोमती ठाकूर यांनी सांगितले. महिला व बालविकास विभागामार्फत विविध योजनांचे सादरीकरण सह्याद्री आथितिगृह येथे करण्यात आले. महिला व बालविकास मंत्री श्रीमती ठाकूर यांनी कार्यभार घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी लगेच आढावा बैठक घेऊन कामकाजास सुरुवात केली.

राज्यगृहे व संरक्षणगृहे, निराश्रीत स्त्रियांसाठी प्रशिक्षण केंद्र, आधारगृहे चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान, विविध व्यवसायभिमुख शिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन, देवदासी व त्यांच्या मुलांचे शिक्षण पुनर्वसन, स्वयंसिद्धा योजना, कामधेनू योजना व अन्य योजनांचे सादरीकरण विभागाद्वारे करण्यात आले.

शासकीय बालगृहे व निरीक्षण गृहे, निराश्रीत बालकांसाठी संस्थेतर सेवा (बालसदन बालकाश्रम), बालगृहे व जोपासना, अनाथालये व राष्ट्रीय शिशु कक्ष निधी अंतर्गत केंद्रिय अनुदान प्राप्त पाळणाघर योजना या सर्व बालविकाससंदर्भातील योजनांचे सादरीकरण देखील यावेळी करण्यात आले. विविध विभागांची सद्यस्थिती सुरु असलेले कार्य व योजना यांची सविस्तर माहिती घेऊन विकासकामांच्या दृष्टीने उपाययोजनांच्या सूचना मंत्री श्रीमती ठाकूर यांनी दिल्या. सादरीकरणानंतर मंत्री श्रीमती ठाकूर यांनी विविध विभागातील अधिकाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी महिला व बालविकास सचिव आय. ए. कुंदन, आयसीडीएस आयुक्त इंद्रा मालो तसेच बालहक्क आयोगाचे अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक, 'माविम' तथा महिला व बालविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# महिलांना सन्मान मिळवून देण्यासाठी महिला आयोग प्रयत्नशील : रहाटकर

## महिला आयोग तुमच्या दारी उपक्रमांतर्गत जनसुनावणीला सांगलीत प्रतिसाद

**सांगली :** महिलांना देण्यात येणारे दुय्यम स्थान हेच महिलांवरील अत्याचाराला कारण ठरत आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी अविरत प्रयत्न करत आहे. महिलांनी जीवनातील समस्या, अत्याचार यामुळे निराश व हतबल न होता महिला आयोगाची मदत घ्यावी. राज्य महिला आयोगा अन्याय, अत्याचार पिडीत महिलांच्या जखमांवर मातेच्या ममतेने फुंकर घालण्याचे काम करीत आहे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत सांगली जिल्ह्यातील तक्रारींची जनसुनावणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली सखी वन स्टॉप सेंटर, सांगली येथे घेण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, महापौर संगीता खोत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती विश्वास माने, एमएसईबीच्या संचालिका नीता केळकर, उपजिल्हाधिकारी विजया यादव, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक वीरकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार, विधी अधिकारी डी. पी. बोराडे, जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांना सन्मान मिळवून देणे, स्त्री, पुरूष समानतेचे मुल्य रूजविणे, पिडीत, शोषित महिलांना न्याय मिळवून देणे, महिलांच्या संदर्भातील संरक्षक कायद्यांबद्दल जाणीवजागृती करण्याचे काम राज्य महिला आयोगाकडून करण्यात येत असल्याचे सांगून ॲड. विजया रहाटकर म्हणाल्या, जीवनात येणाऱ्या समस्यामुळे निराश होवू नका. तसेच अन्याय, अत्याचार सहन करू नका, कोणताही प्रसंग तुमच्यावर ओढवल्यास तुम्हाला तातडीचा निवारा, वैद्यकीय सेवा, कायदेशीर सल्ला, समुपदेशन, पोलीस सहाय्य यासाठी शासनाने सखी मदत केंद्र (वन स्टॉप सेंटर) सुरू केले आहे. महिलांनी त्वरीत मदतीसाठी १८१ या सीएम हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा. त्यांना तात्काळ मदत उपलब्ध करून दिली जाईल.

अत्याचारग्रस्त महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी महिला आयोग आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणं आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणामुळे शक्य होत नाही. त्यांना या उपक्रमाचा फायदा होणार आहे. महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत सुनावणी दरम्यान नव्या तक्रारीवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचे काम आयोगाव्दारे होत







असल्याचे ॲड. विजया रहाटकर यांनी सांगितले. महिला आयोग तुमच्या दारी उपक्रमांतर्गत जनसुनावणीला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. यावेळी सुमारे ७० प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली.

जनसुनावणीनंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ॲड. विजया रहाटकर यांनी राज्य महिला आयोगाने डिजीटल साक्षरता हा उपक्रम हाती घेतला असून या माध्यमातून महिलांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणारे डिजीटल ज्ञान देण्यासाठी ५०० संस्थांच्या माध्यमातून राज्यभरात १ लाख महिलांना डिजीटल साक्षर करण्यात येत आहे. याला ग्रामीण भागात महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे असे सांगितले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, पूर्वीच्या तुलनेत आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात दाद मागण्यासाठी महिला आता पुढे येत असून कायद्याबद्दल जाणीवजागृती वाढत आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून कायद्यांबाबत जाणीवजागृतीवर अधिकाधिक भर देण्यात येत आहे. प्रास्ताविक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी केले. आभार यांनी मानले.

या कार्यक्रमास न्यायालयीन अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी तसेच सुनावणीसाठी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# कोल्हापूर जिल्ह्यातील २४ तक्रारींची सुनावणी

**कोल्हापुर :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' अंतर्गत आज कोल्हापुर येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील प्रलंबित आणि नव्या तक्रारी अशा एकूण २४ तक्रारींवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, सदस्या रोहिणी नायडु, डॉ अभिनव देशमुख पोलिस अधीक्षक, कोल्हापुर, प्रेरणा कट्टे, पद्मा कदम, पोलिस उपअधीक्षक, बी जी काटकर जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, आनंदा शिंदे समन्वयक, महिला आयोग, संजय चौगुले संरक्षण अधिकारी, सामाजिक कार्यकर्त्या यांच्या उपस्थितीत दाखल तक्रारींची सुनावणी, समुपदेशन प्रक्रिया झाली आहे. विभक्त होण्याचा निर्णय घेतलेल्या जोडप्यांचे समुपदेशन यावेळी करण्यात आले. यातील १ जोडपे पुन्हा एकमताने संसारात रमले आहे. प्राप्त तक्रारींचे स्वरुप पाहता पॉक्सो, मालमत्ता विषयक, लैंगिक शोषण आणि मोठया प्रमाणावर कौटुंबिक कलहाच्या तक्रारी प्राप्त झाल्या. निकाली न निघालेल्या तक्रारींमध्ये संबंधित यंत्रणाना नोटीस बजावून ३० दिवसात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.



याबाबत बोलताना महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या कि, आयोग आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत अनेक महिलापुढे येऊन तक्रारी करत आहेत. सर्व यंत्रणा सुनावणीला उपस्थित असल्याने कारवाई वेगाने होऊन तक्रारी निकाली काढण्यास मदत होत आहे.





# सातारा जिल्ह्यातील ३५ तक्रारींची सुनावणी

## विभक्त होण्याच्या मार्गावर असलेली २ जोडपी पुन्हा संसारात रमली

**सातारा :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' अंतर्गत आज सातारा येथे जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील प्रलंबित आणि नव्या तक्रारी अशा एकूण ३५ तक्रारींवर सुनावणी घेण्यात आली.

यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, सदस्या रोहिणी नायडु, जिल्हा परिषद सीईओ संजय भागवत, जिल्हा पोलिस अधिक्षक तेजस्विनी सातपुते, विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रवीण कुंभोजकर, पोलिस उपअधीक्षक राजेंद्र साळुंखे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रोहिणी ढवळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज ससे (बालकल्याण, जि.प.), सामाजिक कार्यकर्त्या यांच्या उपस्थितीत दाखल तक्रारींची सुनावणी, समुपदेशन प्रक्रिया झाली आहे.

विभक्त होण्याचा निर्णय घेतलेल्या जोडप्यांचे समुपदेशन यावेळी करण्यात आले. यातील २ जोडपी पुन्हा एकमताने संसारात रमली आहेत.

प्राप्त तक्रारींचे स्वरुप पाहता पॉक्सो, मालमत्ता विषयक, लैंगिक शोषण आणि मोठ्या प्रमाणावर कौटुंबिक कलहाच्या तक्रारी प्राप्त झाल्या. निकाली न निघालेल्या तक्रारींमध्ये संबंधित यंत्रणाना नोटीस बजावून ३० दिवसात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.



याबाबत बोलताना महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या की, आयोग आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत अनेक महिलापुढे येऊन तक्रारी करत आहेत. सर्व यंत्रणा सुनावणीला उपस्थित असल्याने कारवाई वेगाने होऊन तक्रारी निकाली काढण्यास मदत होत आहे.





# महिलांना सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य महिला आयोग प्रयत्नशील

सांगली, दि. ४, - महिलांना देण्यात येणारे दुय्यम स्थान हेच महिलांवरील अत्याचाराला कारण ठरत आहे असे सांगून महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी अविरत प्रयत्न करत आहे. महिलांनी जीवनातील समस्या, अत्याचार यामुळे निराश व हतबल न होता महिला आयोगाची मदत घ्यावी. राज्य महिला आयोग अन्याय, अत्याचार पिडीत महिलांच्या जखमांवर मायेच्या ममतेने फुंकर घालण्याचे काम करीत आहे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत सांगली जिल्ह्यातील तक्रारींची जनसुनावणी राज्य महिला आयोगाच्या ...

आमदार सुधीर गाडगीळ, महापौर संगीता खोत, जिल्हा परिषदेचे मु'ख कार्यकारी अधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती विश्वास माने, एमएसईबीच्या संचालिका निता केळकर, उपजिल्हाधिकारी विजया यादव, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक वीरकर, महानगरपालिका उपायुक्त स्मृती पाटील, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार, विधी अधिकारी डी. पी. बोराडे, जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण विभागाच्या उपमु'ख कार्यकारी अधिकारी शिल्पा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांना सन्मान मिळवून देणे, स्त्री, पुरुष समानतेचे मुल्य रुजविणे, पिडित,

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर



करण्यात येत असल्याचे सांगून अ‍ॅड. विजया रहाटकर म्हणाल्या, शिक्षण घेणाऱ्या समस्यामुळे निराश होवू नका. तसेच अन्याय, अत्याचार सहन करु ...

शासनाने सखी मदत केंद्र (वन स्टॉप सेंटर) सुरु केले आहे. महिलांनी त्वरीत मदतीसाठी १८१ या मोफत हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा.

यासाठी महिला आयोग आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न ...

शक्य होत नाही. त्यांना या उपक्रमाचा फायदा होणार आहे. महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत सुनावणी दरम्यान नव्या तक्रारीवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचे काम आयोगाद्वारे होत असल्याचे अ‍ॅड. विजया रहाटकर यांनी सांगितले.

महिला आयोग तुमच्या दारी उपक्रमांतर्गत जनसुनावणीला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. यावेळी सुमारे ७० प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली.

जनसुनावणीनंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत अ‍ॅड. विजया रहाटकर यांनी राज्य महिला आयोगाने डिजिटल साक्षरता हा उपक्रम हाती घेतला असून महिलांना डिजिटल साक्षर करण्यात येत आहे. याला ग्रामीण भागात महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे असे सांगितले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, पूर्वीच्या तुलनेत आजकालच्या अत्याचाराच्या विरोधात दाद मागण्यासाठी महिला आता पुढे येत असून कायद्याबद्दल जागृती वाढत आहे. विद्यापीठे, महाविद्यालये, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून कायद्यांबाबत जागृतीवर अधिकाधिक भर देण्यात येत आहे.

प्रास्ताविक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी केले. आभार जिल्हा परिविक्षा अधिकारी सुरेंद्र बेंद्रे यांनी मानले.

या कार्यक्रमास न्यायालयीन अधिकारी, जिल्हा महिला व बाल ... कारी कार्यालयाचे ... कर्मचारी तसेच ... महिला मोठ्या संख्ये...

# महिला आयोगाच्या जनसुनावणीत शंभरावर गाऱ्हाणी

## महिलांसाठी १८१ हेल्पलाईन क्रमांक सुरू : विजयनगर येथे सखी वन स्टॉप सुरू

प्रतिनिधी
सांगली

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमास सांगलीत मोठा प्रतिसाद मिळाला. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ही जनसुनावणी घेतली. या जनसुनावणीस १०० हून अधिक तक्रारदार महिलांनी आपली गाऱ्हाणी मांडल्या. यावेळी रहाटकर यांच्याहस्ते विजयनगर येथे सखी वन स्टॉप सेंटरचे उदघाटन करण्यात आले.

राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून ...



सांगली : महिलेची तक्रार ऐकून घेताना विजया रहाटकर बाजूस अन्य.

आले आहे. या सखी वन स्टॉप केंद्राचे उद्घाटन महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्याहस्ते करण्यात ...

... यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

विजया रहाटकर यांनी उपस्थित तक्रारदार महिलांची जनसुनावणी घेत महिलांच्या अडचणी समजावून घेतल्या तसेच या तक्रारीनुसार कारवाईबाबत आदेश दिले. महिलांच्या सुरक्षिततेसाठी १८१ ही हेल्पलाईन सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये कौटुंबिक, शासकीय, न्यायिक तसेच सायबर आणि सेक्सुअल हरॅसमेंट याबाबतच्या तक्रारी महिलांनी मांडल्या. यामध्ये अनेक तक्रारींवर जाग्यावर सुनावणी करण्यात आली आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला बाल विकासचे अधिकारी सुरेंद्र बेंद्रे, विधी अधिकारी दीपिका बोराडे, संरक्षण अधिकारी दीपक पाटील, सरिता वाडेकर, अनुपमा मोकाशी, राजश्री काळे आदींनी सहकार्य केले.

**सखी वन स्टॉप सेंटर**

कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी झालेल्या पीडित महिलांना या केंद्रामध्ये पाच दिवस राहण्याची, जेवणाची सोय केली जाते. या महिलेला आधार आणि कायदेशीर साहाय्य केले जाते. या केंद्राचे प्रतिनिधी न्यायिक मदतीपासून ते पोलीस फिर्यादीपर्यंत सर्व मदत या पीडित महिलांना करतात. महिलांच्या अन्यायाविरोधात तिला न्याय मिळवून देण्याचे काम हे कार्यालय करते.




सांगली : महिला तक्रारी जनसुनावणी निमित्त कार्यक्रमात बोलताना विजया रहाटकर. यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, महापौर संगीता खोत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत राऊत, नीता केळकर आदि.

# एक लाख महिलांना डिजिटल साक्षर करणार

## विजया रहाटकर : सोशल मीडियामुळे महिलांवरील अत्याचारात वाढ

सांगली : प्रतिनिधी

सध्याचे युग हे डिजिटल आहे. यामध्ये महिला पाठीमागे राहू नये, यासाठी महिला आयोगाने डिजिटल साक्षरता हा उपक्रम हाती घेतला आहे. दैनंदिन जीवनात आवश्यक असणारे डिजीटल ज्ञान देण्यासाठी ५०० संस्थांच्या माध्यमातून राज्यभरात १ लाख महिलांना डिजिटल साक्षर करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी शनिवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील तक्रारींची जनसुनावनी रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली येथील 'सखी वन स्टॉप सेंटर'मध्ये घेण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार सुधीर गाडगीळ, महापौर संगीता खोत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश विश्वास माने, एमएसईबीच्या संचालिका नीता केळकर आदि उपस्थित होते.

दरम्यान महिला आयोग तुमच्या दारी उपक्रमांतर्गत जनसुनावनीला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. यावेळी सुमारे ७० प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली.

रहाटकर म्हणाल्या, अत्याचारग्रस्त महिलांना त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये विभाग स्तरावर महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणं आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणामुळे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना या उपक्रमाचा फायदा होणार आहे. या सुनावणी दरम्यान नव्या तक्रारीवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते; त्यामुळे आपली कैफियत मांडणाऱ्या महिलांना त्वरित दिलासा देण्याचे काम आयोगाद्वारे होत आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुवर्णा पवार यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा परिविक्षा अधिकारी सुरेंद्र बेंद्रे यांनी आभार मानले.

**त्वरीत मदतीसाठी १८१ क्रमांकावर संपर्क करा**

रहाटकर म्हणाल्या, महिलांनी अन्याय, अत्याचार सहन करू नयेत. कोणताही प्रसंग ओढवल्यास तातडीचा निवारा, वैद्यकीय सेवा, कायदेशीर सल्ला, समुपदेशन, पोलिस सहाय्य यासाठी शासनाने सखी मदत केंद्र (वन स्टॉप सेंटर) सुरू केले आहे. ही मदत त्वरित मिळण्यासाठी १८१ या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा.

# महिलांवरील सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ

## विजया रहाटकर । महिलांसाठी सोशल मीडिया चिंताजनक; सखी मदत केंद्राचा होईल लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली** : सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांची बदनामी, त्यांच्या फोटोच्या गैरवापरामुळे सोशल मीडिया महिलांसाठी चिंताजनक ठरत असून, महिलांवरील सायबर गुन्ह्यात वाढ होत आहे, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी शनिवारी पत्रकार बैठकीत दिली.

'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत आयोजित सुनावणीसाठी रहाटकर सांगलीत आल्या होत्या. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत आयोगाचे कामकाज, महिलांवरील अत्याचाराच्या घटना याबाबत माहिती दिली. यावेळी आमदार सुधीर गाडगीळ, महापौर संगीता खोत यांची उपस्थिती होती.

रहाटकर म्हणाल्या, कुटुंबासह समाजाकडूनही महिलांना समानतेची आणि सन्मानाची वागणूक मिळणे अपेक्षित असते. ती महिलांना मिळावी यासाठी आयोगातर्फे उपक्रम राबविण्यात येत आहेत. सध्या अत्याचाराच्या घटना होत असल्या तरी त्यात तंत्रज्ञानामुळे होत असलेल्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. पती-पत्नीमधील वाद, कौटुंबिक वादातून महिलांवर अत्याचार होत असतानाच आता सायबर गुन्ह्यांचेही प्रमाण वाढत आहे. सोशल मीडियावर बदनामी करणे, महिलांच्या फोटोचा गैरवापर करण्याचे प्रकार वाढत आहेत. सोशल मीडिया कंपन्यांची देशाबाहेर कार्यालये असल्याने गुन्हे उघडकीस आणण्याचे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले आहे.

महिलांना सन्मान मिळवून देणे, स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य रुजविणे, पीडित, शोषित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. अत्याचार होणाऱ्या महिलांना तातडीने वैद्यकीय सेवा, कायदेशीर सल्ला, समुपदेशन, पोलीस मदत मिळण्यासाठी शासनाने सखी मदत केंद्र सुरू केले आहे. राज्यात ११ केंद्रे सुरू असून, जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

**डिजिटल ज्ञानासाठी प्रयत्नशील!**

रहाटकर म्हणाल्या, महिला आयोगाने डिजिटल साक्षरता हा उपक्रम हाती घेतला असून, या माध्यमातून महिलांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणारे डिजिटल ज्ञान देण्यासाठी ५०० संस्थांच्या माध्यमातून राज्यभरात १ लाख महिलांना डिजिटल साक्षर करण्यात येत आहेत. याला ग्रामीण भागात महिलांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य वापर महिलांना समजणार आहे.

# Mumbai: Rural women turning digitally literate

By Narsi Benwal

**Mumbai 13-01-2020** : From booking gas cylinders to obtaining a 7/12 extract, women in rural Maharashtra usually visit the concerned offices personally and stand in long serpentine lines, this, despite the digital boom in the country.

The reason one can cite is the low digital literacy among rural women unlike their counterparts in urban areas or the metro cities.

Now, the rural women are getting lessons on using android phones and various mobile apps to make their lives simpler. They are being taught how to use the essential apps, social media and how to keep data safe.

This is part of the special drive to make rural women digitally literate. Launched by Maharashtra State Commission for Women (MSCW), the drive enables women to use a smart phone and digital media for daily use.

"The present generation is dominated by digital media and one can see there is a separate and dedicated application for every service—food, groceries, banking.

The apps are used extensively by everyone in cities but not preferred by rural people," said Vijaya Rahatkar, MSCW chief, adding, rural women are not well-versed with electronic gadgets and apps available on the digital platforms.

"Thus, we approached NGOs, educational institutions and other firms to help us teach women to use social media and various apps. Fortunately, over 500 such institutions were

THE FREE PRESS JOURNAL SINCE 1928

roped in. Now, the campaigns are going on in 500 remote Maharashtra," said Rahatkar.

Notably, MSCW has spent over Rs1 crore on this and targets to educate at least one lakh women.

Activist Rajashree Burkule, who taught women to make good use of digital media in Nashik, said the rural women have shown keen interest in learning the new concepts.

"We began with teaching them how to make use of mobile apps as we noted their lives are limited to using WhatsApp and FB or clicking pis," said Burkule.

"But now after the sessions, I can say almost all the women (who attended the session) can book gas cylinders online, can shop (both groceries and clothing) on the net.

They have learnt how to get their 7/12 extracts, to make e-payments or transfer money," Burkule said, adding, the women are taught to use Umang app, which provides over 400 services or govt schemes, apart from Tejaswini app, started by MSCW to provide legal, medical and police help. "I am confident now and can easily use a few applications like for groceries or the ones for some government scheme. I am happy that much of my work is completed in a single click," said Sushila Chavan from Pune.



# Women break free in rural Maharashtra, get appsolutely phone-smart

Written by : Tabassum Barnagarwala

**Mumbai : December 30, 2019**

The Maharashtra State Commission for Women has started giving digital training to rural and tribal women to make them self-sufficient in using the Internet to pay utility bills, access government schemes, and register complaints online.

In rural Maharashtra's Daregaon village, a 16-year-old girl last month used her phone to register an online complaint on the Tejaswini application against a local boy who was sexually harassing her.

In the nearby Ramnagar village, Neeta Nene learnt how to upload all identification documents on Digilocker.

Neeta's neighbour Radha Kishore now uses Google Assistant to see recipes.

And Sangeeta Satpute spends most of her spare time searching about the online dairy market, and how to sell her cattle produce in Jalna.

The Indian EXPRESS
JOURNALISM OF COURAGE

The Maharashtra State Commission for Women has started giving digital training to rural and tribal women to make them self-sufficient in using the Internet to pay utility bills, access government schemes, and register complaints online.

All that they need is a smartphone. Since November, 50 workshops for 1,000 women have been held across Maharashtra. The Commission plans to finally organise 450 workshops for 1 lakh women.

In Wada, a town in the tribal Palghar district

some 90 km from Mumbai, Akshata More (39) was ready with a notebook and pen to take copious notes in a panchayat hall with 200 other women during one such workshop.

Several women had brought their husbands' phones for the day.

More has a basic smartphone, and only knows how to dial a number. She does not understand what the Internet is, but plans to teach her three daughters, the eldest aged 18, its use for online education material.

As the session begins, trainer Komal Jadhav starts with explaining the difference between smartphones and ordinary ones, and teaches the basics of using a smartphone -taking pictures, connecting to WiFi, setting up wallpaper.

Jadhav then moves on to a more complex operation: how to download a mobile app. As she gives step-by-step instructions, the women are glued to their mobile screens, asking each other about which icon to select. Some without a phone make notes to later try it at home.

"I want to learn more about farming and how to sell our produce online. There are so many fertilizers to chose from. I thought I can learn how to use the Internet, and teach my husband," said Archana Sambre (34), a villager in Wada.

Her neighbour Kanchan Palekar (24) is more digital savvy, she knows how to use WhatsApp. "But I want to learn more, all these apps that we can use for payments," she said.

These women are being taught six mobile applications - Tejaswini, Bhim, Aaple Sarkar, Umang, NaMo, and Digilocker — apart from using Google Assistant. "One villager has started using Google Assistant to even set alarms," said Gracy Cardozao, project incharge at the women's Commission. The Commission has trained 50 women to give digital training, and each is paid Rs 3,000 per session.

After every workshop, spanning over four hours, the women are added on a WhatsApp group, and given daily exercises. Says trainer Usha Shinde, from Jalna, "There is excitement in middle-aged women to learn more. Every day we ask them to try something new on phone, make a digital payment or scan and upload documents. Those who face problems are given step-wise assistance."

39-year-old Manasi Sawant, a villager in Palghar, said: "My son knows how to use a smartphone, but never had time to teach me. I want to learn how to make calls, chat on WhatsApp, so that I don't need to rely on my children for help."

Kamini Waghat (23), who came along with her newborn baby, said learning how to use the Internet will help her family in farming. "There are new techniques on the Internet about farming. We can now use it to improve produce without relying on the local administration," she said.

While the Umang app provides information on 440 government schemes, the Bhim app is useful in making digital payments. Maharashtra's Aaple Sarkar provides a portal to register complaints against government officials.

"On the Tejaswini app, women can register complaints of sexual or domestic violence, or workplace harassment. Several women fear reaching out to the village panchayat," said Vijaya Rahatkar, Chairperson of the women's Commission.

For trainer Usha Shinde, the best outcome of digital training has been the motivation it has provided to two schoolgirls, aged 15 and 16, in her village Daregaon.

"Both registered sexual harassment complaint on that app. A few boys in school were sexually harassing them. They could not dare to approach police. But after I taught them these apps, they quietly registered a complaint on the Tejaswini app," Shinde said.

The only hiccup in these sessions has been with the NaMo app-the first app that these women are taught to remain updated with news about Prime Minister Narendra Modi. It is 50 MB in size, and takes up 30-45 minutes to download in poor network regions.

# भारताची ग्रेटा थनबर्ग : लिसीप्रिया कंगुजम





**हवामानातल्या बदलांच्या विरोधात लढा देण्यासाठी स्वीडनची सोळा वर्षीय कार्यकर्ती ग्रेटा थनबर्गप्रमाणेच भारतातही एका आठ वर्षांच्या मुलीने पुढाकार घेतला आहे. तिचे नाव आहे लिसिप्रिया कंगुजम. तिला 'भारतीय ग्रेटा' म्हणून देखील ओळखले जाते.**

**प्राची एक्के**
Prachi.ekke@gmail.com

हवामानातल्या बदलांच्या विरोधात लढा देण्यासाठी स्वीडनची सोळा वर्षीय कार्यकर्ती ग्रेटा थनबर्गप्रमाणेच भारतातही एका आठ वर्षांच्या मुलीने पुढाकार घेतला आहे. तिचे नाव आहे लिसिप्रिया कंगुजम. तिला 'भारतीय ग्रेटा' म्हणून देखील ओळखले जाते. ती मणिपूरची रहिवासी आहे. तिने स्पेनची राजधानी माद्रिद येथे नुकत्याच पार पडलेल्या 'सीओपी २५' या हवामान परिषदेमध्ये भाषण करीत साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले. तिच्या भाषणाने उपस्थित अत्यंत प्रभावित झाले. या वेळी तिने जागतिक नेत्यांना हवामान बदलांच्या विरोधात त्वरित पावले उचलण्याचे आवाहन केले. लिसिप्रिया कंगुजमने आतापर्यंत हवामान बदलांवर २१ देशांमध्ये भाषणे केली आहेत. लिसिप्रियाने भविष्यासाठी 'सर्व्हायव्हल किट' देखील तयार केले आहे. जम्मूमधील आयआयटीच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने हे किट विकसित केले गेले आहे. या किटमध्ये एका काचेच्या बॉक्समध्ये एक वनस्पती आहे, जी स्वच्छ हवा देण्यासाठी मास्कला जोडली गेली आहे.

आपल्या पुढील पिढीला स्वच्छ जग देण्यासाठी तिने एक मोहीमदेखील सुरू केली आहे. दुसरीत शिकत असलेली आठ वर्षीय लिसिप्रिया हिने संसद भवनाच्या बाहेर उभे राहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे हवामान बदलांवर कठोर कायदे करण्याची मागणी केली. तिचा असा विश्वास आहे की, जगभरातील नेत्यांनी तिच्या म्हणण्यानुसार वागण्याची गरज आहे. जेव्हा संपूर्ण देश आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत होता, तेव्हा दिल्लीत ही सात वर्षाची मुलगी संसदेच्या बाहेर उभी होती आणि एक विशेष संदेश देत होती. 'हवामान बदलाचा कायदा करा आणि आपले भविष्य वाचवा.' असे ती सांगत होती. ती म्हणाली, "समुद्र पातळी वाढत आहे आणि पृथ्वी तापत आहे. त्यामुळे त्यांनी यावर कार्य केले पाहिजे." लिसिप्रियाने अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून जागतिक नेत्यांसमोर वातावरण बदलाची नैसर्गिक आपत्ती कमी करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल आवाहन केले आहे.

वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी, लिसिप्रियाला २०१८मध्ये मंगोलियामधील आपत्तीच्या प्रश्नावर शिखर परिषदेत बोलण्याची संधी मिळाली. ती म्हणाली, 'या परिषदेने माझे आयुष्य बदलले. जेव्हा आपत्तींमुळे मुले त्यांच्या पालकांपासून विभक्त होतात तेव्हा मी रडते. मंगोलियाहून परत आल्यानंतर लिसिप्रियाने आपल्या वडिलांच्या मदतीने 'द चाइल्ड मूव्हमेंट' नावाची संस्था स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून तिने जागतिक नेत्यांना हवामान बदलांच्या विरोधात पावले उचलण्याचे आवाहन केले. लिसिप्रियाने आतापर्यंत २१ देशांना भेटी दिल्या आहेत आणि हवामान बदलाच्या मुद्द्यावर विविध परिषदांमध्ये ती बोलली आहे. ती जगातील सर्वात तरुण पर्यावरणीय कार्यकर्ती असल्याचे म्हटले जाते.

हवामान बदल ही जगाची एक मोठी समस्या आहे, जी सामान्य जीवनावर परिणाम करीत आहे. बऱ्याच खासदारांचा असा विश्वास आहे की हवामान बदलाचा मान्सूनच्या दिशेने व स्थितीवर परिणाम होत आहे आणि यामुळे शेतीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या राज्यात मान्सूनविषयी वाढती अनिश्चितता दिसून येत आहे. तमिळनाडू आणि दक्षिण भारतातील इतर राज्यांमधील पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक धोकादायक ठरू



शकते. सरकार ज्या जलाशयांतून लोकांना पिण्यासाठी पाणी देत आहे, ते सर्व कोरडे होत आहेत. चेन्नईतील पाण्याचे संकट चर्चेत आहे. हीच परिस्थिती दक्षिण भारतातील इतरही अनेक शहरांची आहे. उन्हाळ्यात दरवर्षी पाण्याची कमतरता असली तरी यावर्षी संकट अधिक मोठे आहे. केंद्रीय जल आयोगाचे म्हणणे आहे की, चेन्नई व इतर मोठ्या शहरांतील जलसंकटाचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे जलाशयांमधील पाण्याची पातळी कमी होत आहे. ताज्या अहवालानुसार, तामिळनाडूतील प्रमुख जलाशयांमध्ये सरासरीपेक्षा ४० टक्के कमी पाणीसाठा आहे, दक्षिण भारतातील ३१ मोठ्या जलाशयांमध्ये त्यांची क्षमता फक्त १० टक्के शिल्लक आहे. कर्नाटकची सर्वांत वाईट परिस्थिती आहे. जेथे त्यांच्या क्षमतेपैकी केवळ १ ते २ टक्के पाणी चार प्रमुख जलाशयांमध्ये शिल्लक आहे. अशा परिस्थितीत सरकारला आता या जलसंकटावर दूरगामी तोडगा काढावा लागेल. असे लिसिप्रियाचे सांगणे आहे.

वयाच्या सातव्या वर्षांपासून पर्यावरण वाचवण्यासाठी कंगुजम हिने ही मोहीम सुरू केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात भारताचे प्रतिनिधित्व करणारी ती सर्वांत तरुण भारतीय आहे. लिसिप्रियाने वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी आठ देशांना भेट दिली असून अनेक ठिकाणी भारताचे प्रतिनिधित्वही केले आहे. लिसिप्रियाच्या मते टीव्हीवर नैसर्गिक आपत्तींनी ग्रस्त लोकांना पाहून तिला भीती वाटली. कारण यामुळे मुले त्यांच्या पालकांना गमावताना तिने पहिले. तिची अशी विनंती आहे की अशा परिस्थितीत लोकांनी एकमेकांना मदत केली पाहिजे.

लिसिप्रियाचा जन्म इम्फाळ येथे झाला, परंतु ती दिल्ली आणि भुवनेश्वरमध्ये राहते. हवामान बदलाच्या प्रश्नावर तिची आवड असल्यामुळे ती शाळेत जाऊ शकली नाही. या कारणास्तव, तिने गेल्या फेब्रुवारीमध्ये शाळा सोडली. जागरूकता मोहिमा, परिषदांचे आयोजन व मोर्चांसाठी तिने शालेय शिक्षण सोडले आहे. तिने सांगितले की, सुट्टीमध्ये सर्व कार्यक्रमांचे आयोजन करूनही अभ्यासासाठी वेळ मिळणे कठीण होते.

लिसिप्रिया हिला डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम बाल पुरस्कार २०१९, भारत पीस पुरस्कार २०१९ आणि जागतिक बाल शांतता पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. २०१९ मध्ये, तिने युवा पर्यावरणवाद्यांसाठी ग्रेटा थनबर्गसमवेत संयुक्त राष्ट्र महासभेने आयोजित केलेल्या बैठकीतही भाग घेतला होता.

लिसिप्रियाचे वडील के. के. सिंह सांगतात, "माझ्या मुलीचे बोलणे ऐकून ती फक्त आठ वर्षांची आहे यावर कोणाचाही विश्वास बसत नव्हता." लिसिप्रियाच्या वडिलांच्या म्हणण्यानुसार, मुलीला संयुक्त राष्ट्रांनी शिखर परिषदेला उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले होते, पण मग आम्ही विचार केला की स्पेनला जाण्याचा खर्च कसा भागवला जाईल? यासाठी बऱ्याच मंत्र्यांना ई मेलद्वारे मदतीसाठी विनंती केली होती, पण काहीच उत्तर आले नाही. भुवनेश्वरमधील एका व्यक्तीने माद्रिदसाठी तिकीट बुक केले, पण माद्रिदला रवाना होण्याच्या आदल्या दिवशी, सरकारकडून ई मेलद्वारे कळविण्यात आले की, लिसिप्रियाच्या स्पेन दौऱ्यातील एक दिवसाचा खर्च स्पॅनिश सरकार करेल. ते म्हणाले की, तिची ही लढाई आमच्यासाठीही कठीण आहे. संसदेसमोर निदर्शने करण्यासाठी लिसिप्रियाची शाळा सुटली. आम्हाला दर आठवड्याला दिल्लीला जाणे अवघड होते, परंतु मुलांचे भविष्य वाचविण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन लिसिप्रियाने जागतिक नेत्यांना केले.

के. के. सिंह म्हणाले, "लिसिप्रियाला योग्य मार्गदर्शन करणे हे आमच्यापुढील आव्हान आहे. आम्ही तिला केवळ सुट्टीच्या दिवशीच मोहिमेशी संबंधित काम करण्याचा सल्ला देतो. पण ती एक स्वप्रेरित मुलगी आहे. शाळा संपल्यापासून आम्ही घरीच तिच्या शिक्षणाकडे लक्ष देत आहोत. नुकत्याच नामांकित शाळेतून लसिप्रियाचे विनामूल्य शिक्षण घेण्याचा प्रस्ताव आला आहे." देशातील सर्व मुलांना पर्यावरणातील बदलांवर कार्य करण्याचे आवाहन लिसिप्रिया करीत आहे. लिसिप्रियाने तिच्या पालकांनाही सायकल वापरण्याचा सल्ला दिला आहे.

ओळख कायद्याची




# सायबर गुन्ह्यांपासून... बालकांचा बचाव

**महिलांविषयक कायदे विषयक जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाने ‘विधिलिखित’ (भाग २) ही पुस्तक मालिका प्रकाशित केली आहे. त्या मालिकेतील बालकांविषयीच्या सायबर गुन्हेविषयक कायद्यांची माहिती...**

भारतामध्ये सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानामध्ये प्रगती झाली आहे. मात्र त्यामुळे बालकांच्या सुरक्षेचे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत ऑनलाइन अवकाशामध्ये तर हा धोका आणखीच वाढला आहे. साधनांची उपलब्धता वाढली आहे. त्यामुळे शिकाऱ्याला आपली ओळख लपवून ठेऊन सावज शोधणे सोपे झाले आहे. त्यामुळे कायदेशीर यंत्रणेपुढे नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. ऑनलाइन गुन्ह्याबाबत असलेली कमी माहिती आणि त्याबाबतचे अज्ञान यामुळे भारताच्या सध्याच्या कायदेशीर चौकटीत अनेकदा या गुन्ह्याचा तपास शक्य होत नाही. त्यामुळे बालकांची सुरक्षितता धोक्यात येते. या पुस्तिकेचा मुख्य उद्देश हा बालकांच्या विरुद्ध घडणाऱ्या प्रमुख सायबर क्राईमचा शोध घेणे आणि त्यासाठी कायद्यात असलेल्या तरतुदींची माहिती देणे हा आहे. त्याचा सामाजिक कार्यकर्त्यांना आणि कायदेशीर यंत्रणांना उपयोग होइल. सायबर क्राईम करणाऱ्यांना शोधणे त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे आणि शिक्षा देणे यामुळे शक्य होईल.

कायद्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले आहे की सध्याच्या भारतीय न्यायव्यवस्थेत बालकांच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत अनेक तरतुदी आहेत. पोस्को ॲक्ट नुसार बलकांविरुद्ध घडणारे लैंगिक गुन्हे रोखता येऊ शकतात. माहिती तंत्रज्ञान कायद्याद्वारे सायबर क्राईम विरुद्ध लढता येते. भारतीय दंडविधान संहितेणे सर्वच व्यक्तींना सुरक्षा प्रदान केली आहे. त्यामध्ये बालकांचाही समावेश होतो. या कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीच्या शरीर, मन ,प्रतिष्ठा किंवा मालमत्ता यांचे रक्षण करण्यासाठी विविध कलमे आहेत. बालकांची मानवी तस्करी आयटीबी कायद्याने रोखली जाऊ शकते .ऑनलाइनशी संबंधित बहुतांश गुन्हे या कायद्यानुसार दखलपात्र आहेत. यातील काही जामीनपात्र तर काही अजामीनपात्र आहेत . यातील काही गुन्हे एक ते तीन वर्षे कारावासाची शिक्षा असलेले आहेत काही गुन्ह्यात मात्र पाच ते सात वर्षाची सक्तमजुरी दिलेली आहे. बालकांविरुद्ध घडणाऱ्या बहुतांश गुन्ह्यांसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये तरतुदी आहेत बलकांविरुद्ध ऑनलाइन अवकाशात होणारे




गुन्हे हे ऑफलाईन किंवा प्रत्यक्षपणे होणाऱ्या गुन्ह्यांची संबंधित असतात. उदाहरणार्थ बालकांची तस्करी यामध्ये ग्रूमिंग, लैंगिक छळ,फसवणूक याचबरोबर वेश्याव्यवसाय यासारखे अनेक गुन्हे एकमेकात मिसळलेले असतात. यासाठी वेगवेगळी कलमे कायद्यामध्ये आहेत.

ऑनलाइन गुन्ह्याबाबत कायद्यांचे ज्ञान,तत्पर यंत्रणा आणि सर्वंकष कायद्याची चौकट यातूनच या गुन्ह्यांना रोखणे शक्य होईल, या दृष्टीने ही माहितीपुस्तिका महत्वाची आहे.

## या व्याख्या आहेत महत्वाच्या...

**बालक :** वयाची १८ वर्ष पूर्ण न केलेली व्यक्ती

**सहमती :** दोन किंवा जास्त व्यक्ती एकमेकांशी सहमत आहे असे म्हणतात तेव्हा त्या एखाद्या गोष्टीबाबत सहमत असतात. मात्र लैंगिक क्रियेमध्ये बालकाची सहमती गृहीत धरली जात नाही.

**पोक्सो कायदा :** लैंगिक शोषणांपासून बालकांचे संरक्षण कायदा

**सायबर :** माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट आणि आभासी जग

**डार्क वेब :** बनावट आय पी अ‍ॅड्रेसद्वारे हेतुपूर्वक लपविलेला इंटरनेटचा भाग

**अविश्वास :** चुकीच्या पद्धतीने काहीतरी मिळवण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीसोबत हेतुपूर्वक केलेली वाईट कृती किंवा दुसऱ्या व्यक्तीचा नुकसान होणार आहे माहित असुनही केलेली चुकीची कृती

**फसवणूक :** फसवणूक करण्याच्या इराद्याने एखाद्या व्यक्तीने केलेली कृती.

**हॅपी स्लॅपिंग :** मोबाईल किंवा कॅमेऱ्याच्या साह्याने बालकाचे चित्रण करून त्याची छळवणूक करणे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून ती प्रकाशित करणे

**ओळख :** एखादी व्यक्ती कोण आहे हे सिद्ध करणारे पुरावे. उदाहरणार्थ त्या व्यक्तीचे नाव, पत्ता,कुटुंबियांची माहिती किंवा दुसरे युनिक आयडेंटिफिकेशन

**किलॉगर :** कीबोर्ड वर झालेले सर्व काम रेकॉर्ड करणारी संगणकीय प्रणाली

**मालवेअर :** संगणक, मोबाईल या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा ताबा घेण्यासाठी तयार करण्यात आलेली संगणकीय प्रणाली. यामध्ये व्हायरस, ट्रोजन यांचा समावेश होतो. यातून ही उपकरणे किंवा प्रणाली निकामी करण्याचा प्रयत्नही होऊ शकतो.

**माध्यम :** समूहाशी संवाद. उदाहरणार्थ मुद्रित माध्यम यामध्ये पुस्तके, मासिके, वृत्तपत्र ,टेलिव्हिजन, चित्रपट,व्हिडिओ गेम्स, संगीत संगणकीय प्रणाली आणि ऑनलाइन कन्टेन्ट यांचा समावेश होतो.

**ऑनलाइन सेफ्टी :** इंटरनेटचा वापर करताना घ्यावयाची काळजी.

**फिशिंग :** या आर्थिक गुन्ह्यात गुन्हेगार बनावट ई-मेल किंवा संदेश पाठवतात आणि अकाऊंटची माहिती, पासवर्ड मिळवितात. त्याद्वारे बेकायदेशीरपणे अकाउंट मधून पैसे काढून घेतात .

**प्रायव्हसी :** घुसखोरी, गुप्त टेहळणी याबरोबरच लोकांच्या नजरेपासून दूर राहण्याचे स्वातंत्र्य, त्याचबरोबर स्वतःचा डाटा किंवा माहिती दुसऱ्यापासून सुरक्षित ठेवण्याचे स्वातंत्र्य.

**रिव्हेंज पोर्नोग्राफी :** एखाद्या व्यक्तीशी असलेले संबंध संपुष्टात आल्यावर पूर्वी तिच्याबरोबर केलेल्या लैंगिक क्रियांचे क्लिप्स लोकांपर्यंत पोहोचविणे. यातून त्या व्यक्तीला छळण्याचा प्रयत्न करणे

**सेक्सटीन :** लैंगिक क्रिया असलेल्या मजकुराचे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरण यामध्ये दोघांचे समाधान किंवा आनंद असू शकतो. मात्र अनेकदा याचा वापर अपमान करण्यासाठी किंवा दुसऱ्याचा छळ करण्यासाठी केला जाऊ शकतो.

**लैंगिक शोषण :** लैंगिक कृतीसाठी बालकांचा वापर करणे आणि त्या बदल्यात पैसे किंवा इतर लाभ मिळवणे. ग्राहक आणि बालकाच्या दरम्यान मध्यस्थ किंवा एजंट बनून काम

**ट्रोलिंग :** ऑनलाइन माध्यमांवर शेरेबाजी करून सातत्याने त्रास देणे

**बिटकॉइन :** हे एक प्रकारचे डिजिटल चलन आहे. जागतिक पातळीवर स्वतंत्रपणे वितरणाची व्यवस्था आहे.



## लैंगिक छळवणुकीसाठी शिक्षा

**भारतीय दंडविधान संहिता १८६० कलम ३५४ c (३)**

**वर्णन :** कलम ३५४ c नुसार एखाद्या महिलेला तिच्या इच्छेविरोधात पोर्नोग्राफी दाखविणे हा गुन्हा आहे. हाच गुन्हा बलिकेस लागू होतो. हा दखलपात्र परंतु जामीनपात्र गुन्हा आहे. यासाठी ३ वर्ष कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**कलम ३५४ c :** खाजगी लैंगिक क्रिया संमतीशिवाय रेकॉर्ड करणे,दुसऱ्यास पाठवणे किंवा त्याबाबतची प्रतिमा दाखवणे. मात्र या कायद्यामध्ये रिव्हेंज पोर्नोग्राफी ( बदला घेण्यासाठी केलेली पोर्नोग्राफी) याबाबत कायदेशीर व्याख्या नाही. त्यामुळे या कायद्यातील व्याख्या आणि त्याचा लावलेला अर्थ रिव्हेंज पोर्नोग्राफीसाठी लागू होतो. याबाबतचा पहिला गुन्हा हा दखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हा आहे. मात्र दुसरा गुन्हा अजामीनपात्र आहे. यासाठी कमीत कमी एक वर्ष आणि जास्तीत जास्त तीन वर्षे शिक्षा आहे. दुसऱ्या गुन्ह्यासाठी कमीत कमी तीन वर्ष आणि जास्तीत जास्त सात वर्ष कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे.

## कायद्यातील कलम

पुरुषाने पुढील गोष्टी केल्या तर त्याच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो

१. शारीरिक स्पर्श आणि स्पष्टपणे लैंगिक भावनेने घेतलेला नकोसा पुढाकार
२. लैंगिक सुखाची मागणी वा विनंती
३. महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध पोर्नोग्राफी दाखविणे.
४. लैंगिक हावभाव करणे

वरील गोष्टी केल्यास तो लैंगिक छळवणुकीचा गुन्हा होतो. या कलमातील पहिल्या तीन गुन्ह्यांसाठी पुरुषाला जास्तीत जास्त तीन वर्षे सक्तमजुरी आणि दंड होऊ शकतो. या कलमातील चौथ्या गुन्ह्यासाठी पुरूषाला एक वर्ष शिक्षा होऊ शकते.

## कलम ३५४

कोणी आपल्याला पाहणार नाही किंवा आपले निरीक्षण करू शकणार नाही अशा ठिकाणी आपण आहोत असे वाटून खाजगी कृती करत असलेल्या महिलेला पाहणे किंवा तिचे छायाचित्र काढणे किंवा छायाचित्रे प्रसारित करणे हा गुन्हा आहे. अपराध्यास कमीत कमी एक वर्ष आणि जास्तीत जास्त तीन वर्षे कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते. याच प्रकारच्या दुसऱ्या गुन्ह्यासाठी सात वर्षे कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

## स्पष्टीकरण

खाजगी कृती याचा अर्थ अशा परिस्थितीत कृति जी सर्वसाधारणपणे खाजगी स्वरूपाची असते. या कृतीमध्ये महिलेची जननेंद्रिय किंवा स्तन उघडे असु शकतात किंवा केवळ अंतर्वस्त्रे परिधान केलेले असतात किंवा महिला स्वच्छतागृहाचा वापर करीत असेल किंवा महिला अशी लैंगिक कृती करत असेल जी सर्वसाधारणपणे सार्वजनिक रित्या केली जात नाही.

एखाद्या महिलेने छायाचित्रांसाठी परवानगी दिली पण तिसऱ्या व्यक्तींपर्यंत जाऊ नये अशी इच्छा व्यक्त केली असेल पण तरीही ही छायाचित्रे किंवा कृती प्रसारित केली तर तो गुन्हा मानला जातो.

## केस लॉ

**हैदराबाद रिवेंज पोर्न केस**

रुपेश बंडा याचे एका महिलेशी संबंध होते. महिलेने संबंध संपुष्टात आल्यावर रुपेशने तिच्या गुप्तपणे काढलेल्या व्हिडिओ वरून ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. त्याने व्हिडिओ प्रसारित केला. महिलेने तक्रार केल्यावर बंडा वर कलम ३५४ आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला.

## फसवणूक

फसवणूक म्हणजे एखाद्याचा केलेला विश्वासघात त्यामुळे त्याची शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा प्रतिष्ठेचे नुकसान झाले आहे. बालकाची फसवणूक म्हणजे त्याला असे करायला लावणे जे त्याने किंवा तिने अन्यथा केले नसते. भारतीय दंड विधान आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यातील विविध कलमानुसार फसवणुकीसाठी शिक्षा होऊ शकते.

## कायद्यातील तरतुदी

**भारतीय दंड विधान संहिता कलाम ४१५/४१७**

एखाद्या व्यक्तीची दुसऱ्याकडून विश्वासघाताने किंवा ठगगिरीने फसवणूक झाली. यामुळे त्याच्या मालमत्तेचे नुकसान झाले किंवा कायदेशीर गरज नसतानाही त्याला काहीतरी गमावण्याची वेळ आली. त्यामुळे त्याचे नुकसान झाले किंवा त्याची शारीरिक, मानसिक,आर्थिक फसवणूक झाली, त्याच्या प्रतिष्ठेला बाधा आली तर त्या व्यक्तीकडून फसवणूक झाली आहे असे म्हणता येईल. हा दखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हा आहे. यासाठी जास्तीत जास्त १ वर्ष कारावास आणि दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## कायद्यातील कलम

**स्पष्टीकरण :** विश्वासघात आणि सत्य गुप्त ठेवणे म्हणजे फसवणूक. याचा या कलमातील अर्थ पुढीलप्रमाणे

१. अ आपण नागरी सेवेत असल्याची बतावणी करत असेल आणि ब ची फसवणूक करून त्याचा विश्वासघात करत असेल, आणि ब कडून अवाजवी अपेक्षा करत असेल आणि त्या बदल्यात त्याला काही देत नसेल तर फसवणूक करत आहे.
२. अ एखादी वस्तू बनावट पद्धतीने बनवत असेल पण ब ला दर्जेदार उत्पादन असल्याची बतावणी करून विकत असेल तर अ कडून फसवणूक होत आहे.
३. अ कडून ब ला चुकीचा नमुना दाखवून वस्तू विकत घेण्यास भाग पाडत असेल तर तो फसवणूक करत आहे.
४. अ ने एखादी वस्तू व कडून मागविली परंतु तिचे बिल दिले नाही.

## भारतीय दंड विधान संहिता कलम ४१६ / ४१९

**वर्णन**

जाणून-बुजून तोतयेगिरी करून एखाद्याची फसवणूक करणे.
स्पष्टीकरण : तोतयेगिरी करणे हा गुन्हा दखलपात्र पण जामीनपात्र आहे. कलम ४१९ नुसार जास्तीत जास्त तीन वर्षे कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा आहेत.

## कलम ४२०


एखाद्या व्यक्तीने विश्वासघाताने केलेले मालमत्तेचे हरण किंवा फेरफार करून संपूर्ण किंवा काही भागांची सुरक्षित ठेव नष्ट करणे किंवा कोणतीही किंमती ठेव खोटी सही करून ताब्यात घेणे यासाठी शिक्षा आहे. हा दखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हा आहे. यासाठी सात वर्षांपर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे

## माहिती तंत्रज्ञान कायदा २000 ६६ डी

वर्णन - भारतीय दंडविधान कलम ४१५ नुसार ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने केलेल्या फसवणुकीसाठी शिक्षा होते. कलम ६६ डी नुसार इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे फसवणूक झाल्यास वेगळी शिक्षा आहे. हा दखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हा आहे यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकते.

## सायबर स्टॉकिंग

सायबर स्टॉकिंगचा सर्वसाधारण अर्थ म्हणजे इंटरनेट किंवा दुसऱ्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या द्वारे एखाद्या व्यक्तीला त्रास देणे, त्याच्यावर पाळत ठेवणे. कायद्यामध्ये सायबर स्टॉकिंग साठी विशिष्ट व्याख्या किंवा तरतूद नाही. मात्र या प्रकारच्या घटनांसाठी कायद्यातील अनेक कलमान्वये गुन्हा दाखल होऊ शकतो. एखाद्या बालकावर सायबरस्टॉकिंग केली जात आहे याचा अर्थ इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या द्वारे त्याचा सतत पाठलाग केला जात आहे किंवा पाळत ठेवली जात आहे किंवा त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. या हालचालीमुळे बालकाच्या खासगीपणावर अतिक्रमण होते सायबर स्टॉकिंगद्वारे बालकावर लैंगिक



अत्याचार केले जाऊ शकतात किंवा इतर वाईट गोष्टी त्याच्या बाबतीत होऊ शकतात.

## पोक्सो कायद्यातील तरतुदी

लैंगिक भावनेने बालकावर लैंगिक अत्याचार करण्यासाठी केलेली सायबर स्टॉकिंग पोक्सो (लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण कायदा) कायद्यातील कलम ११ (४) नुसार गुन्ह्यास पात्र आहे. एखादी व्यक्ती डिजिटल माध्यमाद्वारे बालकाचे सतत निरीक्षण करत असेल, त्याचा सतत पाठलाग करत असेल तर हा कायदा लागू होतो. निरीक्षण करणे किंवा पाळत ठेवणे हे पाठलागाचे लक्षण आहे. त्याच्या बरोबरीने जर डिजिटल माध्यमातून हे केले असेल तर सायबरस्टॉकिंगचा गुन्हा दाखल होऊ शकतो . सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील कलम ६६ घटनाबाह्य ठरवण्यापूर्वी सायबर स्टॉकिंग या कलमाखाली येत होते. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने श्रेया सिंगल विरुद्ध भारत सरकार या खटल्यामध्ये दिला होता. हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. कलम १२ नुसार कोणीही व्यक्तीने बालकावर लैंगिक अत्याचार केले तर त्यास जास्तीत जास्त तीन वर्ष कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे.

## कायद्यातील कलम

लैंगिक अत्याचार : लैंगिक इच्छेने एखादी व्यक्ती एखाद्या बालकावर लैंगिक अत्याचार करत आहे हे पुढील मुद्द्याद्वारे स्पष्ट होते

१. एखादा शब्द उच्चारणे किंवा आवाज करणे किंवा हावभाव करणे किंवा एखाद्या वस्तूकडे किंवा शरीराच्या भागाकडे निर्देश करणे.
२. एखाद्या व्यक्तीने स्वतःला किंवा दुसऱ्या व्यक्तीला पाहण्यासाठी बालकाच्या शरीराचे किंवा शरीराच्या भागाचे प्रदर्शन करण्यासाठी प्रवृत्त करणे.
३. पोर्नोग्राफिक हेतूने बालकाला एखादी वस्तू दाखविणे.
४. प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल माध्यमातून बालकाचा सतत पाठलाग करणे, निरीक्षण करणे किंवा संपर्क साधण्याचा प्रयत्न करणे.
५. बालकाच्या शरीराच्या भागाचे किंवा लैंगिक क्रियेतील



सहभागाचे इलेक्ट्रॉनिक, फिल्म किंवा डिजिटल माध्यमातून चित्रण करणे किंवा चित्रण केल्याचा आभास निर्माण करणे आणि हे चित्रण प्रसारित करण्याची धमकी देणे.

६. बालकांना पोर्नोग्राफिक हेतूसाठी प्रवृत्त करणे आणि त्यासाठी आमिष दाखविणे बालकावर लैंगिक अत्याचारासाठी जास्तीत जास्त तीन वर्षे कारावासाची शिक्षा आहे कोणत्याही पद्धतीने लैंगिक हेतू जाहीर केला तर दंडाची तरतूद आहे.

## भारतीय दंडविधान संहिता कलम 354 डी

**वर्णन :**

कलम ३५४ डी मध्ये पाठलागाच्या गुन्ह्यासाठी स्पष्ट तरतुदी आहेत. महिलांच्या इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशनची टेहळणी करण्याविरोधात यामध्ये काही उपकलमे आहेत. सायबर स्टॉकिंग या गुन्ह्याचा अर्थही या कलमाद्वारे लावला जाऊ शकतो

पहिला गुन्हा असेल तर हा दखलपात्र परंतु अजामीनपात्र गुन्हा आहे. सायबर स्टॉकिंगच्या पहिल्या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त तीन वर्षे कारावासाची शिक्षा आहे. त्याचबरोबर दंडाची तरतुद आहे. जर सायबर स्टॉकिंग चा दुसरा गुन्हा असेल तर पाच वर्षांपर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

## कायद्यातील कलम

**३५४ डी : स्टॉकिंग**
**कोणीही माणूस जो...**

१. महिलेने स्पष्टपणे नकार दिला असताना तिला सतत संपर्क साधण्याचा प्रयत्न करणे किंवा पाठलाग करणे आणि त्यातून वैयक्तिक संभाषण करण्याचा प्रयत्न करणे.

२. महिलेचा इंटरनेट वापर, ई-मेल किंवा कोणत्याही स्वरूपातील इलेक्ट्रॉनिक संवादाची टेहळणी करणे. त्यांनी स्टॉकिंग्ज गुन्हा केला आहे.

**पुरुषाने सिद्ध केले तर पुढील गोष्टी स्टॉकिंगचा गुन्हा होऊ शकत नाहीत**

१. गुन्हा रोखण्यासाठी किंवा गुन्ह्याचा तपास करण्यासाठी स्टॉकिंग केले असेल आणि स्टॉकिंग चा गुन्हा दाखल असलेल्या व्यक्तीवर राज्य शासनाने गुन्हे रोखण्याचे आणि तपास करण्याची जबाबदारी सोपवलेली असेल

२. कायद्यानुसार हे केले असेल किंवा कायद्याची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी विशिष्ट परिस्थितीत एखाद्या व्यक्तीला हे करावे लागले असेल.
न्याय्य आणि सबळ कारण असलेल्या विशिष्ट परिस्थितीत केलेले असेल

३. स्टॉकिंग्ज पहिल्या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त तीन वर्षे कारावासाची शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे. दुसऱ्या गुण यासाठी जास्तीत जास्त पाच वर्षे कारावासाची शिक्षा आणि दंड होईल.

## केस लॉ :

दारासिंग आणि इतर विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार : आरोपी एका सोळा वर्षांच्या मुलीचा सातत्याने पाठलाग करत होता. त्यांनी एके दिवशी तिला शेतात पकडले आणि बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीचा अश्लील व्हिडिओ देखील बनविला. हा व्हिडिओ गावातील लोकांमध्ये प्रसारित केला. यातील आरोपी दारासिंग,पंकज,रामू उर्फ रामकुमार आणि संजीव यांना पॉस्को कायद्याच्या कलम ११ आणि १२ नुसार आणि भारतीय दंडविधान संहिता कलम ३५४ डी नुसार दीड वर्षांची सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंड सुनावण्यात आला.

## भारतीय दंड विधान संहिता (आयपीसी) कलम ५०९

**वर्णन :** हे कलम महिलांच्या ऑनलाईन लैंगिक छळवणूक विरोधात लागू होत असले तरी पूर्वी ते सायबरस्टॉकिंग गुन्ह्यातही लागू होत असे. याचे कारण म्हणजे महिलेच्या खाजगी आयुष्यात घुसखोरी होत असल्याचा गुन्हा यातून दर्शवला जातो. शब्द, हावभाव किंवा महिलेचा विनयभंग करण्यासाठी केलेली कृती, महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने शब्द उच्चारणे, आवाज करणे, हावभाव करणे किंवा एखाद्या वस्तूकडे निर्देश करणे यातून हे शब्द, आवाज किंवा हावभाव किंवा वस्तूकडे केलेला निर्देश तिला ऐकू येईल किंवा दिसेल आणि यातून महिलेच्या खासगीपणावर आक्रमण होईल. यासाठी संबंधित व्यक्तीला तीन वर्ष साधी कैद आणि दंड अशी शिक्षा आहे.

## केस लॉ

रितू कोहली कोहली या दिल्लीतील एका दूतावासात काम करणाऱ्या ३२ वर्षीय महिलेला अपरिचित व्यक्तीकडून सतत इमेल्स येत




होते. या ई-मेल द्वारे धमकी दिली जात होती की तिचे बनावट फोटो एका वेबसाईटवर टाकण्यात येतील. काही दिवसांनी अपराध्याने तिचे बनावट फोटो पाठवले. त्याचबरोबर टेलीफोन करून तिला लैंगिक संबंध ठेवण्याची धमकी दिली जात होती. दिल्ली पोलिसांनी इंटरनेट प्रोटोकॉल आय पी ऍड्रेस शोधून काढला आणि मनीष काथुरिया या सायबरस्टोकरला अटक केली त्याच्यावर कलम ५०९ प्रमाणे महिलेचा विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## सायबरबुलिंग

एखाद्याची इच्छा नसताना त्याला सतत लिखित तोंडी स्वरूपात किंवा शारीरिक हालचालीतून त्रास देणे म्हणजे धमकी. यामध्ये दुसऱ्या व्यक्तीला धमकावणे, सतत भीती दाखविणे याचाही समावेश होतो. सायबर धमकी म्हणजे धमकीचा प्रकार ज्यामध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, संगणकाच्या मोबाईलच्या किंवा इंटरनेटच्या माध्यमातून संपर्क साधू त्रास दिला जातो. ट्रोलिंग, अफवा पसरवणे हे देखील सोशल मीडियावरील धमकीचे प्रकार आहेत. सायबर छळवणुकीप्रमाणाणेबुलीगचा मुख्य उद्देश एखाद्या व्यक्तीला धमकावणे हा असतो. त्यामुळे पुरेशा कायदेशीर व्याख्येअभावी सायबर बुलिंग साठी कायदा नाही. त्यामुळे सायबर धमकी साठी असलेल्या गुन्ह्याचे कलम या गुन्ह्यासाठी वापरले जाते.

## कायद्यातील तरतुदी

**कलम ५०३, ५०६, ५०७**
**वर्णन :** एखाद्याच्या मालमत्तेचे किंवा प्रतिष्ठेचे नुकसान करणे किंवा तसे करण्याचा प्रयत्न करणारा या कलमान्वये दोषी ठरू शकतो. हेतुपूर्वक एखाद्या व्यक्तीला धमकी देणे किंवा यातून त्या व्यक्तीला स्वतःची इच्छा नसताना बेकायदेशीरपणे एखादी गोष्ट करणे भाग पाडणे धमकी समजण्यात येते.

सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६ घटनाविरोधी ठरविण्याच्या निर्णयापूर्वी सायबर धमकी हा गुन्हा त्याच कलमाखाली नोंदविला जात होता. सर्वोच्च न्यायालयाने श्रेया सिंगल विरुद्ध भारत सरकार या खटल्यामध्ये हा निकाल दिला होता. सायबरबुलिंग नुसार एखाद्या व्यक्तीला धमकावणी देणे हा गुन्हा मानला आहे. कलम ५०६ अन्वये गुन्हेगारी स्वरूपाच्या धमकावण्यासाठी दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. एखाद्या धमकीमुळे जिवाला धोका असेल किंवा एखाद्या महिलेला अनैतिकपणे अस्वस्थ केले गेले असेल तर ही शिक्षा सात वर्षे कारावासा पर्यंत वाढू शकते.

कलम ५०७ अन्वये स्वतःची ओळख लपवून सतत त्रासदायक संवाद साधणे, जे बहुतांश वेळा ऑनलाइन माध्यमातून केले जाते ही देखील धमकावणी आहे. यासाठी दोन वर्ष अतिरिक्त शिक्षा भोगावी लागते. हा अदखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हा आहे.

## केस लॉ

एका मुलाला वर्गमित्रांकडून सोशल मीडियावर त्याला ट्रोल केले जात होते. यामुळे निराश झालेल्या मुलाने हाताची नस कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. वरिष्ठांकडे तक्रार केल्यावर ट्रोलिंग थांबले. या प्रकारच्या केसमध्ये भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ५०३ नुसार गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.



## बदनामी

बदनामी म्हणजे लिखित किंवा तोंडी स्वरूपात एखाद्या व्यक्तीविषयी चुकीची माहिती पसरविणे असून या व्यक्तीचे चारित्र्यहनन होईल. हा प्रकार विविध प्रकारचे सायबर क्राईम उदाहरणार्थ सायबर बुलिंग, सायबर हॅरॅशमेंट यामध्ये वापरला जातो.

## कायद्यातील तरतुदी

**भारतीय दंडविधान सहिता कलम ४९९/५००**

**वर्णन :** बदनामी यासाठी कायद्यामध्ये विशेष व्याख्या आहे आणि यासाठी शिक्षेच्या तरतुदीही आहेत. मात्र कलम ४९९ आणि ५०० ऑनलाईन बदनामी बाबत विशेषत्वाने उल्लेख करत नाहीत. तरीदेखील ही कलमे ऑनलाइन माध्यमांसाठी लागू होतात. बालकाचे चारित्र्यहनन करण्यासाठी जर कोणी ऑनलाईन माध्यमावर त्याच्याविषयी बोलले किंवा लिहिले आणि त्यातून त्याचे चारित्र्यहनन झाले तर त्या व्यक्तीने बालकाची बदनामी केली असे म्हणता येईल. हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. कलम ५०० अनुसार कोणीही दुसऱ्याची बदनामी केली तर त्याला दोन वर्षांपर्यंत साधी कैद आणि दंड किंवा दोन्ही शिक्षा भोगाव्या लागतील.

**कलम ४९९ :** कोणीही शब्दांद्वारे, तोंडी किंवा वाचण्याचा प्रयत्न करून, चिन्हा द्वारे किंवा दृश्य प्रतिमाद्वारे किंवा या प्रतिमा तयार करून आणि प्रकाशित करून दुसऱ्या व्यक्तीची प्रतिष्ठा कमी करण्याचा प्रयत्न केला तर ती बदनामी समजण्यात येते.

स्पष्टीकरण १. मृत व्यक्तीच्या बाबतही बदनामीचा गुन्हा दाखल होऊ शकतो जर या व्यक्तीच्या बदल कुटुंबातील किंवा जवळच्या नातेवाईकांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील.

स्पष्टीकरण २. कंपनी, संस्था किंवा नागरिकांच्या गटाचेही बदनामी होऊ शकते.

स्पष्टीकरण ३. एखादी गोष्ट तिरकसपणे किंवा व्यंगात्मक रीतीने व्यक्त केली तरी त्यातून बदनामी होऊ शकते.

एखाद्या आरोपाने व्यक्तीची बदनामी झाली आहे असे तोपर्यंत म्हणता येत नाही जोपर्यंत त्या आरोपाने व्यक्तीचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे चारित्र्यहनन केले आहे किंवा त्या व्यक्तीची पत समाजात कमी केली आहे किंवा जातीवाचक शब्दांचा वापर करून त्या व्यक्तीची बदनामी करण्याचा प्रयत्न केला आहे किंवा व्यक्तीच्या शारीरिक व्यंगावर टिप्पणी केलेली आहे,त्यातून त्या व्यक्तीला आपली बदनामी झाली असे वाटेल.

**कलम ४९९ मधील तरतुदींना दहा अपवाद आहेत ते पुढीलप्रमाणे :**


१. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने गरजेचा असलेला सत्य आरोप
२. लोकसेवकाणे केलेले सार्वजनिक काम
३. सार्वजनिक प्रश्नाच्या अनुषंगाने व्यक्तीचे कर्तव्य
४. न्यायालय किंवा शासनातर्फे प्रसिद्ध केले जाणे जाणारे अहवाल
५. न्यायालयाच्या कामकाजातील साक्षीदार आणि इतर सहभागी यांनी न्यायालयाच्या परवानगीने केलेले वक्तव्य
६. सार्वजनिक जीवनातील कामगिरी
७. कायद्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चांगल्या भावनेने मारलेला शेरा
८. एखाद्या जबाबदार व्यक्ती बाबत चांगल्या भावनेने केलेला आरोप
९. स्वतःचे किंवा इतरांचे हित जपण्यासाठी चांगल्या भावनेने केलेले आरोप
१० एखाद्या चांगल्या व्यक्तीच्या चांगल्यासाठी काळजीने केलेला आरोप किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने केलेला आरोप.

## बदनामीसाठी शिक्षा

कोणीही दुसऱ्याची बदनामी केली तर त्या व्यक्तीला दोन वर्ष साधी कैद किंवा दंड किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात

## केस लॉ

बारा वर्षाच्या एका मुलाचे फेसबुक फेसबुक अकाउंट हॅक करून



त्यावर बनावट छायाचित्रे टाकली जात होती. या अश्लील प्रकारच्या चित्रांमुळे या बालकांची बदनामी होत होती. यामध्ये या सायबर क्रिमीनल वर वर बदनामीचा गुन्हा दाखल होऊ शकतो .

## भारतीय दंडविधान सहिता कलम 469

**वर्णन :** बदनामीचा मुख्य उद्देश हा दुसऱ्या व्यक्तीची पत कमी करणे आणि त्याचे चारित्र्यहनन करणे असतो. कलम ४६९ नुसार एखाद्या व्यक्तीला अनामिक राहून किंवा गोंधळाच्या स्थितीचा फायदा घेऊन त्रास देणे यासाठी शिक्षेची तरतूद केली आहे. हा अदखलपात्र आणि जामीनपात्र गुन्हा आहे. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त तीन वर्षे कैद आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

## कायद्यातील तरतुदी

**४६९ :** दुसऱ्याची पत कमी करण्यासाठी कोणीही व्यक्ती लिखित स्वरूपातील कागदावर किंवा इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डवर फेरफार करून दुसऱ्या व्यक्तीची बदनामी करत असेल आणि आणि तोच त्याचा उद्देश असेल तर त्या व्यक्तीला जास्तीत जास्त तीन वर्षे कैद आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

## केस लॉ

तामिळनाडू राज्य सरकार विरुद्ध सुहास कट्टी खटला : प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे चाललेल्या या खटल्यात एका महिलेने तक्रार केली होती की एका व्यक्तीकडून तिला याहू मेसेज ग्रुप वर अश्लिल आणि बदनामीकारक संदेश येत आहेत. आरोपी हा परिचयाचा होता आणि त्याची या महिलेशी विवाह करण्याची इच्छा होती. या महिलेने दुसऱ्याबरोबर विवाह केल्यावर आरोपीने इंटरनेटच्या माध्यमातून तिची छळवणूक करण्याचा प्रयत्न सुरू केला. फेब्रुवारी २००४ मध्ये याबाबतचा गुन्हा दाखल झाला. सात महिन्यांच्या आतच चेन्नई सायबर क्राईम सेल खटल्याचा निकाल लावल्यास यशस्वी ठरले. आरोपीला कलम ४६९




५०९ आणि माहिती तंत्रज्ञान कायदा ६७ नुसार दोषी मानण्यात आले.

## 'ग्रूमिंग...'

ग्रूमिंग म्हणजे बालकाशी भावनिक बंध निर्माण करून तिचा किंवा त्याचा विश्वास संपादन करून पुढच्या काळात त्याचे शोषण करण्याचा हेतू मनात धरणे. ग्रूमिंग मध्ये होणारे शोषण हे बहुतांश वेळा लैंगिक स्वरुपाचे असते. यामध्ये बालकाचा चाइल्ड पोर्नोग्राफीसाठी वापर केला जातो किंवा लैंगिक अत्याचार केले जातात. भारतामध्ये ग्रूमिंग ही कायदेशीर परिभाषेतील कल्पना नाही, त्यासाठी कुठल्याही प्रकारची व्याख्या नाही.

एका उदाहरणावरून गृमिंगचा गुन्हा ठरविणे किती अवघड आहे हे स्पष्ट होते. एका प्रकारात आरोपीचा बालकावर इतका प्रभाव होता की त्याच्या आईलाही असे वाटत होते की अगदी अनोळखी असलेला हा आरोपी आपल्या मुलाला चांगले शिक्षण देईल.

ग्रूमिंगचा समावेश वेगळ्या कलमात नाही. उदाहरण म्हणजे गृमिंग म्हणजे अपहरण नाही. त्यात पालकांच्या कायदेशीर कोठडीतून मुलांना हिरावून घेतले जाते. त्याचबरोबर भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३७७ नुसार घडणाऱ्या गुन्ह्यांतही यामध्ये समावेश नाही. ग्रूमिंग ही परिभाषा कायद्यामध्ये स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र ग्रूमिंग ह्या प्रकारांतर्गत घडणाऱ्या कृती कायद्याच्या वेगवेगळ्या कलमाखाली नोंदविता येतात.

## साद दे, साथ घे - प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद दे, साथ घे, अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

# लोकप्रतिनिधींच्या शिक्षणाचे धोरण



**ग्रामपंचायत स्तरावर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना कारभाराची माहिती मिळावी, यासाठी धोरण आखण्यात आले आहे. त्यांची कर्तव्ये, अधिकार, त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा यांची माहिती करून दिली जाते. यामुळे गावपातळीवरील कारभार अधिक प्रभावी होऊ शकेल.**

**भीम रासकर,**
महिला राजसत्ता आंदोलन, सदस्य, राज्य कौन्सिल
9869259194, bhim.rscd@gmail.com

१९९३ नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून सावकाश सुरू झालेली सत्तेच्या विकेंद्रीकरणाची क्रांती भारताने अनुभवली आहे. समाजातील वंचित समाजसमूहांबरोबरच महिलांच्या आरक्षणामुळे गावस्तरावरील दुर्लक्षित नेतृत्वालाही या क्रांतीमुळे नवी संधी मिळाली. आज महाराष्ट्रात एकूण २८,००६ ग्रामपंचायती असून, त्यात सुमारे १,९७,३३८ ग्रामपंचायत सदस्य आहेत. त्र्याहत्तराव्या घटनादुरुस्तीनंतर पंचायत राज संस्थांकडे राज्य सरकारने विविध योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपविली आहे.

ग्रामपंचायत स्तरावर लोकशाही पद्धतीने निवडून आल्यानंतर करावयाच्या कामकाजाची माहिती घेऊन आपल्या पदाला शोभेल, असे काम करणे हे लोकप्रतिनिधींसमोरचे मोठे आव्हान असते. यात ग्रामसेवकांच्या मदतीने ग्रामपंचायतींचे आर्थिक व्यवहार करणे, गावविकास आराखडा तयार करणे, केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या विविध योजना, निर्णय व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, कर गोळा करणे, ग्रामसभा घेणे, मासिक सभा, ग्रामपंचायतींचे विविध रेकॉर्ड ठेवणे, ग्रामसभांमध्ये व विकासप्रक्रियेत लोकांची भागीदारी वाढविणे इत्यादी कामे ग्रामपंचायत स्तरावरील लोकप्रतिनिधींना करावी लागतात.

लोकप्रतिनिधी म्हणून लोकांप्रति असलेल्या जबाबदाऱ्या व भूमिका, मानवी मूल्यांची पाठराखण करणे, समानता, बंधुता, भगिनीभाव, परस्परसन्मान, विविधतांचा आदर या विविध मूल्यांची जोपासना करताना लोकप्रतिनिधी समाजावर वेगळी छाप पाडत असतात. तसेच, समाजातील उतरंडी, भेदाभेद, वंचित व समृद्ध समूह, त्यांचे आपसांतील मतभेद, महिला आणि पुरुषांतील ऐतिहासिक फरक व भेद, जातिभेद, धार्मिक सलोखा व तेढीचे प्रसंग अशा व्यापक मुद्द्यांवर या लोकप्रतिनिधींना महत्त्वाची भूमिका बजावावी लागते.

ग्रामपंचायतीत लोकप्रतिनिधी म्हणून नियुक्त झाल्यावर कारभार परिचय व्हायला हवा म्हणजेच त्यांची सन्मानाने गावाला ओळख होणे, कारभार सुरू होण्यासाठी त्यांना शुभेच्छा देणे, त्यांना ओळखपत्र देऊन त्यांच्या कामाची नेमकी माहिती देणे, ही सर्व कामे लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारल्यानंतर तातडीने होणे आवश्यक असते.

राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींसाठी कारभार परिचय (इंडक्शन) धोरण आखण्याची गरज जाणवत होती. त्यानुसार ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींना किमान तीन महिन्यांत कारभार परिचय प्रशिक्षण देण्याची योजना सरकारने तयार केली. ग्रापचंयातीत सरपंच म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर औपचारिक बैठक व्यवस्था, नेमप्लेट, सरपंच रबर स्टॅम्प, डिजिटल सही, लेटर हेड, ओळखपत्र, निवडून आल्याचे प्रमाणपत्र असा समग्र प्रशासकीय संच सन्मानाने सरपंचांना मिळायला हवा,असे या धोरणात ठरविण्यात आले. या धोरणामुळे काय होईल ते समजून घेऊ या.

नवनियुक्त सदस्यांची ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यानंतर पदभार स्वीकारताना गावस्तरावर लोकप्रतिनिधींचा शपथग्रहण सोहळा होईल. नवनिर्वाचित ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर यांना गावस्तरावरील शासकीय व निमशासकीय यंत्रणा व कर्मचारी परिचय कार्यक्रमाचे आयोजन होईल. स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून

येणाऱ्या प्रत्येक लोकप्रतिनिधींना त्यांची कर्तव्ये, अधिकार आणि त्यांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा भत्ते व मानधनाविषयी माहिती तसेच, पंचायत कारभाराची सोप्या भाषेत ग्रामपंचायतीचे ३ एफ (फंक्शन, फायनान्स आणि फंक्शनरीज) पंचायत प्रशासन मार्गदर्शिका (मॅन्युअल) दिले जाईल. राष्ट्रीय दिनांदिवशी ध्वजवंदनाचा घटनात्मक अधिकार धोरण म्हणून सरपंचांना देण्यात येईल. लोकनियुक्त ग्रामपंचायत सरपंच आणि व सदस्यांना समान बैठक भत्ता व मानधन नियमित दरमहा व सन्मानपूर्वक मिळेल. ग्रामपंचायतींत नव्याने निवडून आलेल्या सरपंच-सदस्यांना ग्रामसेवकांनी दप्तर हस्तांतरासह दप्तर ओळख करून द्यावी. राज्य सरकारने यशदा आणि डीपीआरसीच्या मदतीने ग्रामपंचायत लोकप्रतिनिधींसाठी कारभार परिचयाच्या अभ्यासक्रमासोबतच पंचवार्षिक प्रशिक्षण कॅलेंडर तयार करावे.

गावांतून प्रामाणिक लोकप्रतिनिधी पुढे येऊ लागले, तर त्यांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम होईल आणि त्यांच्या प्रेरणेतून जास्त लोकांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात येण्यासाठी रूची निर्माण होईल. परस्परावलंबी, पारदर्शी, व लोककेंद्री शासनाचे धोरण यातून खालीलप्रमाणे प्रतिबिंबित होईल.

लोक व ग्रामपंचायतीचे नाते बळकट करण्यासाठी ग्रामपंचायत कारभार परिचय धोरणात नव्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. या तरतुदींना कायदेशीर चौकटीत बसविण्याचा प्रयत्न राज्य निवडणूक आयोग आणि ग्रामविकास विभागाने केला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ग्रामपंचायत कारभार परिचय धोरणाला मूर्त रूप मिळाले आहे.

आज ग्रामपंचायत स्तरावर लोकप्रतिनिधींना अनेक सेवा-सुविधा उपलब्ध आहेत. राज्य सरकारच्या विविध विभागांनी वेळोवेळी त्यासंदर्भात शासन आदेश काढले आहेत. त्यांची एकत्रित सूत्ररूपाने मांडणी यात करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने पुढील तरतुदींचा समावेश आहे – निवडणूक जिंकणाऱ्या लोकप्रतिनिधींना प्रमाणपत्र, ग्रामपंचायत सदस्यांना मानधन, सदस्यांना बैठक भत्ता, सदस्य व सरपंचांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता, सरपंच ओळखपत्र, ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रम, झेंडावंदनांचा अधिकार, ग्रामपंचायत पदाधिकारी शिष्टाचार संच, यात ग्रामपंचायतीची मुद्रा, ग्रामपंचायतीचे लेटरहेड, सरपंच, उपसरपंचांना सहीचा अधिकार, संगणकीय सही, सरपंचव उपसरपंचपदाचा शिक्का,





सरपंच, उपसरपंच आसनव्यवस्था व नावाची पाटी.

ग्रामपंचायत स्तरावर सुशासन व्यवस्था टिकविण्याची पहिली जबाबदारी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची असते. त्यासाठी पंचायतीच्या वतीने तो लोकांना उत्तरदायी असतो, म्हणजे लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास बांधील असतो. त्याने पंचायतीची निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चातुर्याने वागून कार्यक्षमतेने परिणामकारक कामाला महत्त्व दिले पाहिजे. समाजातील सर्व स्तरातील लोकांशी समतेने वागून समाजात सर्वसमावेशकता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकप्रतिनिधी म्हणून स्वतःचा व पंचायतीचा आर्थिक कारभार पारदर्शक पद्धतीने होईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नांची उत्तरे आणि सूचनांना प्रतिसाद दिला पाहिजे. सर्वांच्या सहमतीने व सहभागाने पंचायतीच्या विकासकामांना पुढे घेऊन गेले पाहिजे. यासाठी प्रशासकीय मार्गदर्शिका दिशादर्शक म्हणून काम करेल.

ग्रामपंचायतीत निवडून आल्यानंतर आपली पंचायत व्यवस्था कशी आहे, कारभार परिचय धोरणांतर्गत लोक व लोकशाही बळकटीकरणाचे स्थानिक कार्यक्रम कोणते, लोकशाही सुशासनांतर्गत त्यांना मिळालेले अधिकार व सुविधा यांची माहिती तसेच, पंचायत कारभाराची ओळख होण्यासाठी काही उपयुक्त शासन आदेश यांचा अतर्भाव करण्यात आला आहे. गावच्या विकास धोरणाचा व योजनांचा, देशाच्या धोरणाशी, योजनांशी व सर्वंकष विकसाशी कोणता व कसा संबंध आहे आणि त्यातून त्यांची काय कामे असू शकतात, या सर्वांची माहिती लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर लगेच होणे आवश्यक आहे. ही ओळख त्यांना पद्धतशीरपणे, नियोजन करून देता आली तर अंधारात चाचपडत काम करण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही. अतिशय व्यावसायिक, पद्धतशीर व शिस्तबद्ध रीतीने जर गाव प्रश्नांचा अजेंडा राबविला गेला तर, प्रशिक्षित लोकप्रतिनिधींची कौशल्यपूर्ण कामगिरी समोर यायला वेळ लागणार नाही. सर्वसमावेशक असे विकासाचे हे धोरण स्थानिक लोकशाही व्यवस्थेला बळकट करण्यात मोठा हातभार लावील. प्रशासन व शासन हे दोन्ही खांब मजबूत असतील तर गावाचे प्रश्न सोडवायला नक्की वेग प्राप्त होईल. देशात लोकशाही-गावात हुकूमशाही चालणार नाही. हे खरं असलं तरी, त्यासाठी लोकप्रतिनिधींना हक्काची माहिती निवडणूक झाल्याबरोबर मिळाली पाहिजे. हे झालं तर गावविकासाचा चमत्कार नक्की पाहायला मिळेल.



# महाराष्ट्राच्या मुलींची झेप

**खो, मैदानी, जिम्नॅस्टिक्स, कबड्डी, बास्केटबॉल, हातोडाफेक, गोळाफेक या क्रीडा प्रकारात संपूर्ण देशात महाराष्ट्राने आपला झेंडा रोवला. स्पर्धेत सर्वाधिक पदके मिळवत खेळाडूंनी राज्याचा दबदबा देशाच्या क्रीडा क्षेत्रात निर्माण केला.**



**अमित मधुकर डोंगरे,**
amitdongre10@gmail.com

देशात क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी सर्व स्तरांवरुन अनेक प्रयत्न केले जात आहेत. त्यातच खेलो इंडिया या क्रीडा स्पर्धेचा खूप मोठा वाटा आहे. याच स्पर्धेतून देशाला भवीष्यात ऑलिम्पिक स्पर्धेत सोनेरी यश मिळवुन देणारे खेळाडू गवसणार आहेत. खो-खो, मैदानी, जिम्नॅस्टिक्स, कबड्डी, बास्केटबॉल, हातोडाफेक, गोळाफेक या क्रीडा प्रकारात संपूर्ण देशात महाराष्ट्राने आपला झेंडा रोवला. स्पर्धेत सर्वाधिक पदके मिळवत खेळाडूंनी राज्याचा दबदबा देशाच्या क्रीडा क्षेत्रात निर्माण केला.

पूजा दानोळे, इशा पवार, मयुरी लुटे, कीर्ती भोईटे, पूर्णा रावराणे, प्रांजली पाटील, प्रिया गुप्ता या मुलींनी राज्याच्या क्रीडा क्षेत्राला एक नवी ओळख दिली. केवळ पर्यटक म्हणून आता खेळाडू विविध स्पर्धेला जात नाहीत तर गेल्या पाच वर्षांपासून खेळाडूंनी अत्यंत अथक परिश्रम घेत यश खेचून आणले आहे.

कोल्हापूरच्या पूजा दानोळेने सोनेरी घोडदौड कायम राखली आहे. तिने सुवर्णपदकाचा चौकार लगावताना वैयक्तिक परस्यूट स्पर्धा जिंकली. पूजाची सहकारी मयुरी लुटे हिला मात्र स्प्रिंट प्रकारात रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. जागतिक क्रीडा संकुलांनाही लाजवेल असे अद्ययावत व सुसज्ज संकुल गुवाहाटीतील लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थेच्या वेलोड्रममध्ये सज्ज आहे. इथेच महाराष्ट्राने वेस ओलांडत आपा झेंडा रोवला. पूजाने वैयक्तिक चौथे सुवर्णपदक जिंकताना २०० मीटर परस्यूट शर्यतीत २ मिनीट ४७.४१५ सेकंद वेळ दिली. या वेळी तिचा वेग ताशी ४३.०१ प्रति कि.मी. इतका होता. स्पर्धेत पूजाने एकूण चार सुवर्ण आणि एक ब्रॉंझ अशी पाच पदके जिंकली.

पूजाप्रमाणेच सरस कामगिरी करत महाराष्ट्राच्या कीर्ती भोईटे हिने २१ वर्षाखालील मुलींच्या दोनशे मीटर्स धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. तिची सहकारी स्नेहा जाधवने २१ वर्षाखालील गटातील हातोडाफेकीत रौप्यपदक पटकाविले. गोळाफेक प्रकारात पूर्णा रावराणेने खेलो इंडियात गेल्या वर्षी नोंदविलेला वैयक्तिक विक्रम मागे टाकत सोनेरी फेक केली. कीर्तीने उत्कंठापूर्ण लढतीत अन्य खेळाडूंवर निसटता विजय मिळविताना २०० मीटर्सचे अंतर २४.९९ सेकंदांत पार केले. ती मुंबई येथे नरेश कोडुरी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

महाराष्ट्राच्या पूर्णा रावराणे हिने २१ वर्षाखालील मुलींच्या गटात गोळाफेकीत सुवर्णपदक मिळविताना स्पर्धा विक्रम नोंदविला. तिने १४.५७ मीटर्सपर्यंत गोळाफेक करीत अनामिका दास हिने गतवर्षी नोंदविलेला १४.१० मीटर्स हा विक्रम मोडला. पाचव्या प्रयत्नात पूर्णाने सर्वोत्तम कामगिरी केली. ती मालाड येथे हिरेन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. गतवर्षी तिला रौप्यपदक मिळाले होते.

महाराष्ट्राच्या प्रांजली पाटील व प्रिया गुप्ता यांनी १७ वर्षाखालील मुलींच्या १०० मीटर्स अडथळा शर्यतीत अनुक्रमे रौप्य व ब्राँझपदक पटकाविले. या दोन्ही खेळाडू मुंबई येथे जसपालसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. याच वयोगटात प्रिया पाटील, शिवेच्छा पाटील, पूर्वा सावंत व तितिक्षा पाटोळे यांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र संघाने ४ बाय ४०० मीटर्स रिलेत ब्राँझपदक पटकाविले. त्यांनी ही शर्यत ३ मिनिटे ५९.०८ सेकंदांत पार केली.

मुलींच्या २१ वर्षाखालील गटात वैष्णवी यादव, दुर्गा देवरे, कीर्ति भोईटे व निधी सिंग यांचा समावेश असलेल्या महाराष्ट्राला ४ बाय ४०० मीटर्स रिलेत ब्राँझपदकाची कमाई झाली. त्यांनी हे अंतर ३ मिनिटे ५४.२० सेकंदात पूर्ण केले. मुलींच्या १७ वषार्खालील गटात महाराष्ट्राच्या सुदेष्णा शिवणकर हिने २०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत ब्राँझपदक पटकाविले. तिला हे अंतर पार करण्यास २५.२४ सेकंद वेळ लागला. मुलांच्या २१ वर्षाखालील गटात नाशिकच्या प्रसाद अहिरे याला २०० मीटर्स धावण्यामध्ये

ब्राँझपदक मिळाले. त्याने हे अंतर २१.६५ सेकंदात पूर्ण केले.

सायकलिंगमध्ये महाराष्ट्राच्या सायकलपटूंनी पदकांचा सपाटा लावला. महाराष्ट्राच्या पूजा दानोळे हिने आज ५ कि.मी. स्क्रॅच शर्यत ८ मिनीट ४४.७० सेकंद अशी वेळ देत जिंकताना वैयक्तिक तिसरे सुवर्णपदक मिळविले. त्यानंतर तीला १७ वर्षांखालील गटात सांघिक स्प्रिंट प्रकारात आदिती डोंगरेसह ब्राँझपदकावर समाधान मानावे लागले. त्यांनी ५४.७१ सेकंद अशी वेळ दिली. सांघिक स्प्रिंट प्रकारात महाराष्ट्राच्या मुलामुलींनी मक्तेदारी राखली. शुशिकला आगाशे आणि मयुरी लुटे यांनी ४९.७३६ सेकंद वेळासह सोनेरी यश मिळविले.

महाराष्ट्राला मयुरी लुटे हिने २१ वर्षांखालील गटात ५०० मीटर टाईम ट्रायल शर्यतीत वैयक्तिक रौप्यपदक मिळवून दिले. तिने ३८.४६२ सेकंद वेळ दिली. कोल्हापूरच्या पूजाने सलग तिसरे सुवर्णपदक मिळविताना आपली छाप पाडली. स्पर्धेत तिने पाच सुवर्णपदकाचे उद्दिष्ट बाळगले होते. मात्र, तिला ते साधण्यात अपयश आले.

## मुख्यमंत्र्यांकडूनही महाराष्ट्राच्या पूजाचे कौतुक

माजी केंद्रीय क्रीडामंत्री आणि आसामचे मुख्यमंत्री सवानंद सोनोवाल यांनी महाराष्ट्राच्या पूजाने तीन सुवर्णपदके मिळविल्याचे समजल्यावर तिचे कौतुक केले. पूजाच्या कमगिरीने प्रभावीत झालेल्या सोनोवाल यांनी भवीष्यात भारताचे क्रीडा क्षेत्रातील यश सोनेरी असेल याची खात्री पूजासह महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दिल्याचे गौरवोद्गार काढले यातच महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या वर्चस्वाची प्रचिती येते.

## महाराष्ट्राचे पदकांचे शतक

खेलो इंडियात महाराष्ट्राने पदकांचे शतक पूर्ण केले. महाराष्ट्र पदकतालिकेत अव्वल आहे तर हरयाणाने २१ सुवर्णपदकांसह ६७ पदके जिंकत दुसरे स्थान मिळविले आहे. दिल्लीचा संघ १७ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. गेल्या दोन खेलो इंडिया स्पर्धेत अनुक्रमे हरयाणा आणि महाराष्ट्राने अव्वल स्थान मिळविले होते. यावर्षीही या दोन राज्यांत चुरस असेल.

## ईशाचे वर्चस्व

ईशा पवार या चिपळूणच्या खेळाडूने राज्याच्या तिरंदाजी क्रीडा प्रकारात आपले नाव सातत्याने उंचावले आहे. इशाने जी कामगिरी तीच्या इतक्या लहान वयात केली आहे, ती पाहता येत्या काळात तीच्या नावावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरचे बहुतांशी विक्रम जमा झालेले असतील. गेल्या तीन वर्षांत मिनी सबज्युनियर गटात राष्ट्रीय विजेतेपद पटकाविणाऱ्या इशाने खेलो इंडिया स्पर्धेत तिरंदाजीतील कंपाऊंड प्रकारात सुवर्ण जिंकून एक अनोखी झेप घेतली आहे. कोकणातील डेरवणमध्ये ओंकार घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ती शिकते. नववीत असलेल्या ईशासह अनेक मुली ओंकार यांच्या देखरेखीखाली तिरंदाजीचे प्रशिक्षण घेतात. त्यातील ईशाने आता थेट दिल्लीच जिंकली आहे.

छत्तीसगडला झालेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेत ईशाला ब्राँझपदक मिळाले होते. त्या स्पर्धेतील ८ मुलींना मग या खेलो इंडियासाठी संधी मिळाली. तिरंदाजी प्रकारात एकूण १६० मुलांनी देशभरातून भाग घेतला होता. त्यातील ३२ मुली या कंपाऊंड प्रकारात सहभागी झाल्या. पहिल्या रँकिंग फेरीत ईशाने ३२४, ३३६ गुणांसह ३२ मुलींत पाचवे स्थान मिळविले आणि बाद फेरीत धडक मारली. बाद फेरीत तिने पाच आंतरराष्ट्रीय खेळाडूंना मागे टाकले. उपउपांत्यपूर्व फेरीआधी ईशाने इशिता बन्सलला पराभूत केले तर त्यानंतर उपउपांत्यपूर्व फेरीत तिने मणिपूरच्या सुचित्राला मागे टाकले. उपांत्यपूर्व फेरीत तिने सौम्या निधी या खेळाडूला १३९-१३५ अशा फरकाने पराभूत करत उपांत्य फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत तिची गाठ झारखंडच्या सविता कुमारीशी पडली आणि तिने १० गुणांनी विजय मिळवित अंतिम फेरीत मुसंडी मारली. मात्र अंतिम फेरीची झुंज तशी अपेक्षेप्रमाणे अटीतटीची झाली नाही. त्यात ईशाने १८ गुणांनी बाजी मारली.

चौदा वर्षीय ईशाची ही कामगिरी आताची नाही. गेली काही वर्षे ती सातत्यपूर्ण कामगिरी करत आहे. तीने आजवरच्या वाटचालीत पदकांचे अर्धशतक पुर्ण केले असून या स्पर्धेने इशाच्या नावाला राष्ट्रीय ओळख मिळाली आहे.

खेलो इंडिया स्पर्धेने देशातील अनेक खेळाडूंना नवे व्यासपीठ प्राप्त करुन दिले आहे. पी. टी. उषासह अनेक खेळाडूंनी देशाच्या नावलैकिकात वाढ केली आहे पण त्यांच्या वारसदार मिळत नव्हत्या हे १३० कोटी लोकसंख्येच्या देशाचे दुदैव होते मात्र खेलो इंडियाने देशाचा सेकंड बेंच भक्कम असल्याची खात्री दिली आहे, त्यामुळे २०२४ व २०२८ या दोन ऑलिम्पिकमध्ये याच खेळाडू आपल्या देशाला सोनेरी यश मिळवुन देतील असा विश्वास वाटतो.

## टॉपमध्ये समावेश व्हावा

पूजा, इशा यांच्यासह ज्या ज्या खेळाडूंनी राज्याला या स्पर्धेतच नव्हे तर राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश मिळवुन दिले आहे त्यांचा टॉप (टार्गेट ऑलिम्पिक पोडियम) योजनेत समावेश झाला पाहिजे. तर याच खेळाडूंमधून उद्याचे चॅम्पियन्स तयार होतील. टॉप योजनेची व्याप्ती वाढविली पाहिजे व खेळाडूंना खेळाबरोबरच स्थैर्य मिळेल यासाठीही सहकार्य करावे तरच उद्याची पीढी देखील क्रीडा क्षेत्रात पाऊल ठेवेल.








रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

## कायदेविषयक जनजागृतीसाठी
## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची पुस्तकमालिका

# 'विधी'-लिखित

भाग २




# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८ 'सुहिता' हेल्पलाइन - ७४७७७२२४२४

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com



// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२-२६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com



RNI No. MAHMAR49593


प्रति / TO

If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला
आयोग, मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा
बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१